SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०६.०४.२०२६ | अंक नं. ००५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

92.50 शुद्ध चांदीपासुन बनविलेले
खास आपल्या लाडक्या लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैंजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
22 कॅरेट सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-

# राहुरी विधानसभा पोटनिवडणूक न लढण्याचा प्राजक्त तनपुरे यांचा निर्णय; भाजपकडून अक्षय कर्डिले, राष्ट्रवादीचे गोविंदराव मोकाटे यांचा अर्ज दाखल

## वंचित आघाडीकडून संतोष चोळके तर रावसाहेब खेवरे, रवींद्र मोरे यांच्यासह ५ अपक्षांनीही दाखल केले उमेदवारी अर्ज

नगर – राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी मोठ्या घडामोडी घडल्या. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे राहुरीतील माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी ऐनवेळी निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राष्ट्रवादीने माजी पंचायत समिती सदस्य गोविंदराव मोकाटे यांची उमेदवारी जाहीर केली. तर वंचित बहुजन आघाडीनेही ऐनवेळी उमेदवारी बदलून नगरसेवक संतोष चोळके यांचा अर्ज दाखल केला. याशिवाय अपक्ष म्हणून शिवसेनेचे उत्तर जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे, शिंदे शिवसेनेचे रवींद्र मोरे यांच्यासह इतर काहीजणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी १ एप्रिलपासून उमेदवारी अर्जांची विक्री सुरु करण्यात आली होती. ६ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मुदत होती. त्यामुळे ६ एप्रिल रोजी राहुरीत मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी या निवडणुकीतून माघार घ्यावी, यासाठी जलसंपदा मंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे त्यांची मनधरणी करीत होते. त्यांच्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरु होती. ६ एप्रिल रोजी सकाळीच भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तनपुरे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यांच्यामध्ये सुमारे अर्धा तास बंद दाराआड चर्चा झाली. या चर्चेनंतर तिघेही माध्यमांसमोर आले आणि चर्चेतील तपशील माध्यमांसमोर मांडला. यावेळी मंत्री विखे पाटील म्हणाले, तनपुरे यांनी राहुरी मतदारसंघाच्या विकासासाठी माझ्याकडे काही मागण्या मांडल्या आहेत. त्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन त्यांना दिले आहे. प्रदेशाध्यक्ष चव्हाण म्हणाले, तनपुरे यांच्या मागण्यांबाबत आम्ही सकारात्मक आहोत. मतदारसंघाच्या विकासासाठी आम्ही त्यांच्यासोबत उभे राहू, असे आश्वासन त्यांना दिले आहे.





तनपुरे म्हणाले, के. के. रेंजसाठी राहुरी तालुक्यात पुन्हा आरक्षण पडणार आहे. त्यासाठीचे नोटीफिकेशन निघाले आहे. मात्र, मंत्री विखे पाटील यांनी हे आरक्षण रद्द करण्याचे आश्वासन दिले आहे. राहुरी नगरपालिकेला मोठ्या प्रमाणात रस्त्यांसाठी निधी देण्याचे आश्वासन दिले आहे. राहुरी एमआयडीसीसाठी अत्यंत सकारात्मक चर्चा झाली आहे. वांबोरी किंवा ताहाराबाद परिसरात एमआयडीसीसाठी जागा मिळाली तर तेथे एमआयडीसीला मंजुरी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. मुळा धरणातील मोठे पाणी समन्यायी पाणी वाटपामुळे जायकवाडीला जाते. त्यामुळे धरणातील अडीच टीएमसी गाळ काढण्याची उपाययोजना सुरु झाली आहे. मुख्यमंत्र्यांशीही फोनवरुन चर्चा झाली आहे. डॉ. तनपुरे सहकारी कारखान्याचे प्रकरण मंत्रिमंडळ समितीसमोर आहे. त्याबाबत त्यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे. मी ज्या मुद्यांवर निवडणुकीला सामोरे जाणार होतो, ते विकासाचे सर्व मुद्दे सोडविण्याचे त्यांनी ठाम आश्वासन दिले आहे. एका पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, मंत्री अशी मोठी माणसे माझ्याकडे आली आहेत आणि विकासाचे प्रश्न सोडविण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे, असे तनपुरे यांनी जाहीर केले.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे निरीक्षक अंकुश काकडे यांनी राष्ट्रवादीकडून गोविंदराव मोकाटे यांची उमेदवारी जाहीर केली. याबाबत माहिती देताना ते म्हणाले, तनपुरे यांनी आपण निवडणूक लढविणार नसल्याचे पक्षाला कळविले आहे. त्यामुळे पक्षाने महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून गोविंदराव मोकाटे यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

वंचित बहुजन आघाडीकडून देवळाली प्रवरा नगरपालिकेचे नगरसेवक संतोष चोळके यांना उमेदवारी दिली आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर ९ एप्रिल रोजी राहुरीत येत आहेत. त्यांच्या उपस्थित वंचित बहुजन आघाडीचा प्रचाराचा शुभारंभ होणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान राहुरीतून अनिल जाधव यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली होती. मात्र, ऐनवेळी ही उमेदवारी रद्द करण्यात आली आणि त्याऐवजी मराठा समाजातील संतोष चोळके यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली, अशी माहिती वंचितचे राज्यप्रवक्ते अ‍ॅड. अरुण जाधव यांनी दिली.



वाडिया पार्क येथील जलतरण तलावाबाहेर तिकीटासाठी झालेली गर्दी तर दुसऱ्या छायाचित्रात तलावात पोहण्याचा आनंद घेताना नगरकर. (छाया : अमीत मन्यार)

# उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने पोहण्यासाठी जलतरण तलावावर गर्दी, वाडिया पार्क जलतरण तलाव हाउसफुल, तिकिटासाठी लागल्या रांगा

नगर – दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता हळूहळू वाढत चाललेली आहे. त्यामुळे नगरकरांची पावले जलतरण तलावाकडे वळू लागली आहेत. एप्रिलच्या पहिल्याच रविवारी ५ एप्रिल रोजी नगरकरांनी वाडिया पार्क येथील जलतरण तलावावर तोबा गर्दी केली .एखाद्या हाउसफुल सिनेमाच्या तिकिटाला जशी गर्दी जमते तशी पोहोण्याचा आनंद लुटण्यासाठी नगरकरांनी तिकीट खरेदीला तोबा गर्दी केली होती. तिकीट मिळतात पोहण्याचा मनमुराद आनंद नगरकरांनी घेतला.

नगर शहर व जिल्ह्यामध्ये एप्रिलमध्ये उन्हाची तीव्रता जाणवू लागते ती हळूहळू मे च्या अंतिम टप्प्यापर्यंत उच्चतम तापमान गाठते. जसजशी उन्हाची तीव्रता वाढत जाते तस तशी शरीराची लाहीलाही होते. अशातच शरीराचे तापमान राखण्यासाठी सर्व नगरकरांना आकर्षित करते , ते पोहणे पोहण्याचा मनमुराद आनंद लुटण्याची संधी नगरकर कधी सोडत नाही त्यातच सुट्टीचा दिवस व हक्काचा रविवार असल्यास त्यांच्यासाठी हा खास असतो. त्यामुळेच ५ एप्रिल रोजी पोहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.

वाडिया पार्क जलतरण तलावाचे व्यवस्थापक व स्विमिंग कोच सर्वेश देशमुख यांनी नगरकरांनी पोहण्यास येताना सर्व स्विमिंग कॉश्च्युम आणणे आवश्यक आहे. पोहताना कोणतीही धिंगाणा – मस्ती न करता प्रत्येकाने जलतरण तलाव व्यवस्थापन समितीने सुरक्षिते विषयक दिलेल्या सर्व नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. समितीच्या वतीने आवश्यक त्या सुरक्षेतेच्या व प्रशिक्षकांच्या व्यवस्था केलेल्या आहेत. विविध वेळेतील बॅचेस साठी पेड कोच देखील उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे नगरकरांनी जलतरण समितीला सहकार्य करून पोहण्याचा मनमुराद आनंद लुटावा असे आवाहन त्यांनी यावेळी नगरकरांना केले.

# अक्षय कर्डिले यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची उपस्थिती



नगर – स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर जाहीर झालेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी त्यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांनी भाजप पक्षाच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, अहिल्यानगर महापालिकेच्या महापौर ज्योतीताई गाडे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी अक्षय कर्डिले यांनी स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या आई अलकाताई कर्डिले यांनी औक्षण करून आशीर्वाद दिला. आईची गळाभेट घेताना अक्षय कर्डिले भावूक झाले होते. त्यांच्या आईंचे डोळेही पाणावले होते. हा क्षण उपस्थितांना भावनिक करुन गेला. कार्यकर्त्यांनी शिवाजीराव कर्डिले अमर रहे, अशा घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. त्यानंतर कार्यकर्त्यांसह जावून अक्षय कर्डिले यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आमदार सुरेश धस, आमदार मोनिकाताई राजळे, बबनराव पाचपुते, सुभाष पाटील, काशिनाथ लवांडे, अलकाताई कर्डिले, महेंद्र गंधे, संदीप कर्डिले, उदयसिंह पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

अर्ज दाखल केल्यानंतर अक्षय कर्डिले म्हणाले, पोटनिवडणुकीसाठी वडिलांच्या जागेवर उमेदवारी अर्ज दाखल करत आहे. गेल्या तीस–पस्तीस वर्षांपासून वडिलांनी जनतेशी जिव्हाळ्याचे, कौटुंबिक नाते निर्माण केले होते. आज ती संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आली आहे. माझ्या आयुष्यातील ही पहिली निवडणूक असून वडील माझ्यासोबत नाहीत, ही सर्वात मोठी वेदना आहे. मात्र त्यांचा वारसा पुढे नेत सर्वसामान्य जनतेची सेवा करण्यासाठी रात्रंदिवस काम करणार, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

CCTV CAMERA बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

परदेश सफर आता स्वप्न होणार पूर्ण !
सिंगापूर - थायलंड - मलेशिया १० दिवसांची शानदार ग्रुप टूर ३ देश | ५ शहरं
मिळवा आनंद, रोमांच आणि अविस्मरणीय आठवणी!
सहलीची वैशिष्ट्ये: • आरामदायी हॉटेल निवास • जेवणाची उत्तम सोय • रिटर्न फ्लाइट तिकिटे समाविष्ट । सर्व स्थानिक ट्रान्सपोर्ट • आकर्षक साईटसीइंग • व्हिसा सुविधा • अनुभवी टूर मॅनेजर
• मुख्य आकर्षणे : थायलंड: कोरल आयलंड, सफारी वर्ल्ड, चाओ फराया रिव्हर क्रूझ मलेशिया: गेंटिंग हायलँड्स सिंगापूर : युनिव्हर्सल स्टुडिओ, सेंटोसा आयलंड, गार्डन्स बाय द बे, बर्ड पॅराडाईज
₹1,72,000 (मुंबई ते मुंबई)
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
9112384842, 9850063432

लूट लो ऑफर
फक्त पुरुषांसाठी शर्ट, टि-शर्ट, लोवर या पैकी काहिही ३ घ्या फक्त रु.५००/- मध्ये
फॉरमल पॅन्टस्, जीन्स Rs.300/- पासुन पुढे
हाफ व फुल जेन्टस् क्राडसेट Rs.300/- मध्ये उपलब्ध
7XL पर्यंत
फक्त पुरुषांसाठी जेन्टस् शर्ट, नाईट पॅन्ट, टि शर्ट, ट्राऊझर Rs.200/- पासुन पुढे
कार्गो पॅन्ट Rs.250/-
लेडिज व जेन्टस् वॉचेस (घड्याळ) Rs.100/-
जिन्स व फॉर्मल पॅन्ट ४४ साईज पर्यंत व कॉटन पॅन्ट ३८ साईज पर्यंत उपलब्ध
तसेच डिझायन, चेक्सचे शर्ट व व्हाईट शर्ट 7XL साईज पर्यंत उपलब्ध
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल शुभ मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188
Terms & Conditions Apply.

अकोले तालूक्यातील सुप्रसिद्ध इंद्रायणी तांदूळ मिळेल
ध्येय अ‍ॅग्रो
9623576711

डॉ. अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पक्षसंघटन वाढीसाठी व्यापक मोहिम सुरू करणार : अंकुश काकडे

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची बैठक, संघटन बळकटीसाठी रणनीती ठरली

नगर – आपण सर्वजण शरदचंद्र पवार यांच्या विचारांवर चालणारे आहोत. पक्ष फुटल्यामुळे ताकद कमी झाली असली, तरी उरलेले कार्यकर्ते हेच खरे बळ आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीसोबत लढवण्यात आल्या असून, आता संघटन वाढीसाठी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे मार्गदर्शन करताना प्रदेश उपाध्यक्ष तथा पक्षनिरीक्षक अंकुशराव काकडे यांनी सांगितले. मे महिन्यात सलग सात दिवस तालुका बैठका घेऊन संघटन मजबूत करण्यात येणार असून महिला, विद्यार्थी व युवक संघटनांवर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच, निष्क्रिय पदाधिकाऱ्यांना बदलून कार्यक्षम कार्यकर्त्यांना संधी देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, येत्या १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती प्रत्येक तालुक्यात साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले.


राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पक्ष कार्यालयात प्रदेश उपाध्यक्ष तथा पक्षनिरीक्षक अंकुशराव काकडे यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पक्ष कार्यालयात प्रदेश उपाध्यक्ष तथा पक्षनिरीक्षक अंकुशराव काकडे यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली. यावेळी खासदार निलेश लंके, दक्षिण जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, उत्तर जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे, रावसाहेब मस्के, अरुण पाटील कडू, बाबासाहेब भोस, राजेंद्र कोठारी, अशोक बाबर, योगिता राजळे, नामदेव राऊत, सिताराम काकडे, किसनराव लोटके, अथर खान, निलेश मालपाणी, बापूसाहेब रांधवणे, सुरेश गडाख, विजयसिंह गोलेकर, रघुआबा काळदाते, शौकत तांबोळी, विनोद साळवे, हरिदास शिर्के, बाळासाहेब हराळ, शरद पवार, हरीश भारदे, शिवशंकर राजळे,फारुक रंगरेज, बाळासाहेब भांगरे, सुरेश खांडगे, रमेश गव्हाणे, अशोक बागुल, लकी सेठी, चंद्रकांत घुले, शशिकांत लोळगे यांचेसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत सर्व तालुका अध्यक्ष, नवनिर्वाचित नगरसेवक व कार्यकर्त्यांनी आपापले मनोगत व्यक्त करत पक्षाच्या पुढील वाटचालीसाठी विविध उपाययोजना व आंदोलनाची रणनीती मांडली. पक्ष बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांना सक्षम पाठबळ देणे गरजेचे असून, आलेली मरगळ एकजुटीने दूर करून नव्या जोमाने लढा उभारण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी खासदार निलेश लंके म्हणाले की, तालुका अध्यक्षांनी मांडलेले मुद्दे हे प्रत्यक्ष ग्राउंड रिपोर्टवर आधारित आहेत. सत्ताधाऱ्यांकडून खोटे गुन्हे दाखल करून विरोधकांना त्रास देण्याचे प्रकार वाढले आहेत. मात्र, अशा परिस्थितीत खचून न जाता गावागावात जाऊन नागरिकांचे प्रश्न सोडवावेत, स्वतःचे नेतृत्व उभे करावे आणि आठवड्यातून किमान दोन दिवस तालुका स्तरावर कार्यालय सुरू ठेवून जनतेशी संपर्क वाढवावा.

तसेच सार्वजनिक व सामाजिक कार्याचा अजेंडा पुढे घेऊनच सर्वांनी वाटचाल करावी, असेही त्यांनी नमूद केले. लवकरच प्रत्येक तालुक्यात पक्ष कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही अडचणीत कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उत्तर जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पक्षाची ताकद ही तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये आहे. प्रत्येक गावात संघटन पोहोचवून नव्या कार्यकर्त्यांना संधी देणे आवश्यक आहे. युवक, महिला आणि विद्यार्थी यांना पक्षाशी जोडून संघटन अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे. तसेच येणाऱ्या काळात महाविकास आघाडी मजबूत करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

दक्षिण कार्याध्यक्ष सीताराम काकडे यांनी प्रास्ताविक केले. अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान यांनी आभार मानले.

## सागर गोंधळे यांचे अल्प आजाराने निधन


नगर – तोफखाना भराडगल्लीतील रहिवासी सागर बाळासाहेब गोंधळे (वय ३८) यांचे ५ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी लालटाकी येथील स्मशानभूमीत करण्यात आला.



त्यांच्या मागे आई, वडील, २ भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे. संदीप व सचिन गोंधळे यांचे ते बंधू होत.

## दादासाहेब पाखरे यांचे हृदयविकाराने निधन

नगर – निलक्रांती चौकातील फुले शाहू आंबेडकर चळवळीतील मार्गदर्शक सेवानिवृत्त मुख्याध्यापक दादासाहेब हरिभाऊ पाखरे (वय ७८) यांचे ५ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ५ एप्रिल रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुन असा परिवार आहे. ॲड. संदीप पाखरे यांचे ते वडील होत.

## बबनराव कोतकर यांचे दु:खद निधन

नगर – केडगाव येथील मुंजोबा चौकातील रहिवासी बबन भाऊ कोतकर (वय ७५) यांचे ५ एप्रिल रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ५ एप्रिल रोजी केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अशोक कोतकर यांचे ते वडील होत.

## जान्हाबाई गुंजाळ यांचे अल्प आजाराने निधन

नगर – दरेवाडी मोहनद्वार बेरड पाटील इस्टेट येथील रहिवासी जान्हाबाई यशवंतराव गुंजाळ (वय ८७) यांचे ५ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बेरड वस्ती मळा येथे ६ एप्रिल रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ मुले, ४ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## अभिषेक कळमकर विरोधात स्टँडिंग वारंट

नगर – माजी महापौर अभिषेक कळमकर याच्याविरोधात जिल्हा न्यायालयाने स्टैंडिंग वॉरंट बजावल्याने त्याच्या अडचणीत वाढ झाली आहे. प्रथम वर्ग न्यायालयाने हा आदेश दिला असून, कळमकर याला अटक करण्याचे निर्देश पोलिसांना देण्यात आले आहेत.

त्याच्याविरूध्द २१ फेब्रुवारी रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून तो पसार आहेत. या गुन्ह्याचा तपास तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ हे करीत होते. पुढे हा गुन्हा तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

पोलिसांनी विविध पथके तयार करून कळमकरचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. त्याच्या संभाव्य ठिकाणांवर छापेमारी करण्यात येत असून, तांत्रिक तपासाचाही आधार घेतला जात आहे. तरीही तो अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. न्यायालयाने बजावलेल्या स्टैंडिंग वॉरंटनुसार, संबंधित संशयित आरोपी कुठेही आढळल्यास तात्काळ अटक करून न्यायालयात हजर करण्याचे अधिकार पोलिसांना देण्यात आले आहेत. त्यामुळे कळमकर याच्या अटकेसाठी आता कायदेशीर दबाव अधिक वाढला आहे.


अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी येथे जनगणनेचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण सुरू आहे. जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी प्रशिक्षण केंद्राला भेट देत तयारीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून मार्गदर्शन केले.

# पूर्णपणे कागदरहित आणि डिजिटल पद्धतीने होणार असल्याने जनगणनेचे काम अचूक पूर्ण करा : जिल्हाधिकारी डॉ. आशिया

नगर – आगामी जनगणना–२०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात तयारीला वेग आला असून यावेळची जनगणना पूर्णपणे कागदरहित व डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. त्यामुळे नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाद्वारे तांत्रिक बाबी सखोल समजून घेऊन जनगणनेचे कार्य अचूक व वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी येथे जनगणनेचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण सुरू आहे. जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी प्रशिक्षण केंद्राला भेट देत तयारीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून मार्गदर्शन केले.


जनगणनेचे काम करताना कोणतीही त्रुटी राहू नये व प्रक्रियेत पारदर्शकता राखली जावी, यावर त्यांनी विशेष भर दिला. कर्मचाऱ्यांनी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करावा. तसेच डेटा संकलनाची पद्धत नीट समजून घेऊन फिल्डवर काम करताना येणाऱ्या अडचणींवर तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. सर्वांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याचेही त्यांनी आवाहन केले.

या मोहिमेअंतर्गत ६ ते १५ एप्रिल या कालावधीत तीन टप्प्यांत अधिकाऱ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे. चार मास्टर ट्रेनर्समार्फत एकूण १४२ फिल्ड ट्रेनर्सना प्रशिक्षण दिले जाणार असून प्रत्यक्ष कामाची प्रात्यक्षिकेही दाखविण्यात येत आहेत.

यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, तहसीलदार नागेश गायकवाड, जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय महादेव साळवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, मास्टर ट्रेनर्स व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## सुमनबाई साळुंके यांचे अल्प आजाराने निधन

नगर – शिवाजीनगर दहिगाव बोलका (ता.कोपरगाव) येथील रहिवासी सुमनबाई रावसाहेब साळुंके (वय ६५) यांचे ४ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दहिगाव बोलका (ता.कोपरगाव) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. रविंद्र साळुंके यांच्या आजी होत.

## रोहित भालेकर यांचे अपघातात निधन

श्रीरामपूर – श्रीरामपूर शहरातील बेलापूररोड, बजरंगनगर येथील रहिवासी व सध्या नाशिक येथे वास्तव्यास असलेले रोहित संतोष भालेकर (वय २८) यांचे चिपळूण जि.रत्नागिरी येथील परशुराम घाटात ४ एप्रिल रोजी मध्यरात्री १२:१५ च्या सुमारास अपघाती निधन झाले.



रोहित भालेकर हे आदित्य बिर्ला इन्शुरन्स कंपनीमध्ये नाशिक शहरात एरिया सेल्स मॅनेजर पदावर कार्यरत होते. दरम्यान सुट्टी असल्याने ते त्यांच्या कंपनीचे ३ सहकारी मित्रांसह गणपतीपुळे येथे दर्शनासाठी गेले असताना हा अपघात झाला.

## देवेंद्रनाथ कासार यांचे अल्प आजाराने निधन

नगर – वाळकी (ता.नगर) येथील रहिवासी चेन्नई येथे रेल्वे महानिरीक्षक पदावर कार्यरत असलेले देवेंद्रनाथ भागचंद कासार (वय ५८) यांचे ४ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ५ एप्रिल रोजी वाळकी येथे अंत्यसंस्कार करणयात आले.



त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगी असा परिवार आहे. त्यांना भारत सरकार तर्फे राष्ट्रपती पोलीस पदक देवून गौरविण्यात आले आहे.

## शिवाजीराव चव्हाण यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – येथील ज्येष्ठ नागरिक शिवाजीराव मुरलीधर चव्हाण (वय ८३) यांचे १ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार होता. मूळचे बऱ्हाणपूर (ता. नेवासा) येथील असलेले शिवाजीराव ठाणे येथे सँडोज इंडिया लिमिटेड या बहुराष्ट्रीय कंपनीत जनरल मॅनेजर पदावरून निवृत्त झाले होते. ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते नगरला स्थायिक झाले. ते मनमिळावू व शिस्तप्रिय होते. सी.जी. पॉवर कंपनीचे अधिकारी मिलिंद वाळके यांचे ते सासरे, तर छत्रपती इंजिनीअरिंग कॉलेजच्या विभागप्रमुख डॉ. शिल्पा वाळके यांचे वडील होत. चव्हाण यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी भरदिवसा महिलेचे दागिने लुटले

## इंद्रायणी हॉटेलच्या पाठीमागील रस्त्यावरील घटना, २ चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – मोटारसायकल वर आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी रस्त्याने पायी चाललेल्या एका महिलेला आणि त्यांच्या पुतणीला जीवे मारण्याची धमकी देऊन १७.५ ग्रॅम वजनाचे अंदाजे १ लाख ५० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून नेले आहेत.ही घटना छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील इंद्रायणी हॉटेलच्या पाठीमागे वारुळवाडी (ता.नगर) शिवारात ५ एप्रिल रोजी दुपारी ३.४० वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

याबाबत द्वारका शिवाजी मगर (वय ५०, रा. वारूळवाडी, ता.नगर) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि त्यांची पुतणी दुपारी पावणे चारच्या सुमारास इंद्रायणी हॉटेलच्या पाठीमागील रस्त्यावरून जात होत्या. यावेळी काळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवले. आरोपींनी दोघींनाही जीवे ठार मारण्याची धमकी दिली आणि त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून देण्यास भाग पाडले.

या लुटीमध्ये चोरट्यांनी सुमारे साडे सतरा ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने पळवून नेले असून, त्याची किंमत साधारण दीड लाख रुपये इतकी आहे. चोरी केल्यानंतर आरोपींनी दुचाकीवरून तातडीने पळ काढला. या घटनेनंतर पीडित महिलेने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात दोन आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (४), ३५२, ३ (५) प्रमाणे गुन्हा नोंदवला आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इंगळे करत आहेत.

## सुधाकर घोरपडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – भिंगार येथील माधवबागमधील रहिवाशी सुधाकर हरिभाऊ घोरपडे (वय ७६) यांचे ६ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर लालटाकी येथील स्मशानभूमीत दफनविधी करण्यात आला.



त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. घोरपडे ब्रॉस बॅण्डचे ते संचालक होते.

## वंचाबाई एकशिंगे यांचे वृद्धपकाळाने निधन



आष्टी – चिंचोली येथील वंचाबाई महादेव एकशिंगे (वय ९०) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या. जनता विद्यालय धानोरा येथील प्रा. संभाजी एकशिंगे यांच्या त्या मातोश्री होत.

त्यांच्यामागे दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

## सदाशिव कोठूळे यांचे हृदयविकाराने निधन

नगर – खडकी येथील रहिवासी सदाशिव मारुती कोठूळे (वय ८०) यांचे ५ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ सुना, नातवंडे असा परिवार आहे.



खडकी येथील साईश्रद्धा हार्डवेअरचे अशोक व संतोष कोठूळे यांचे ते वडील होत.

## गळफास घेतलेल्याचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर वाकोडी फाटा, दरेवाडी (ता. नगर) येथे राहत असलेल्या एका व्यक्तीने राहत्या घरात गळफास घेण्याचा प्रयत्न केला होता, त्यांचा उपचारादरम्यान खासगी रूग्णालयात मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. सोन्याबापू गुलाब सुर्यवंशी (वय ५०) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोन्याबापु सूर्यवंशी यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेण्याचा प्रयत्न केल्याची घटना २८ मार्च रोजी रात्री उशिरा घडली होती. त्यानंतर त्यांच्या पत्नी अल्पना सूर्यवंशी यांनी त्यांना तत्काळ सावेडी रस्त्यावरील खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू असताना, ४ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारास उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती भिंगार कॅम्प पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# कॉपर केबल चोरणारा रंगेहाथ पकडला

नगर – नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कामरगाव शिवारात मोबाईल टॉवरमधील कॉपर केबल चोरण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका चोरट्याला पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. भगवान वसंत वांढेकर (रा. राघुहिवरे, पाथर्डी, हल्ली रा. नागापूर एमआयडीसी) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी मारुती सूर्यभान देवकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मारुती देवकर हे चास येथे झोपलेले असताना त्यांना रात्रीच्या वेळी कॉल सेंटरमधून मोबाईलवर संपर्क करण्यात आला. मानभाववाडी कामरगाव शिवार येथील मोबाईल टॉवरच्या कक्षाचा दरवाजा उघडला गेल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार देवकर यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तेथे पोहोचल्यावर त्यांना कक्षाच्या आत एक व्यक्ती संशयास्पदरीत्या उभी असल्याचे दिसून आले.

फिर्यादींनी प्रसंगावधान राखत कक्षाचा दरवाजा बाहेरून बंद केला आणि तातडीने नगर तालुका पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पाहणी केली असता, आरोपी भगवान वांढेकर याने इलेक्ट्रीक बॅटरीच्या कटरच्या साहाय्याने तांब्याच्या ४० फुटी केबलचे ८ तुकडे केल्याचे स्पष्ट झाले. केबल चोरून नेण्याच्या उद्देशाने त्याने हा कट केला होता. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून कटर जप्त करण्यात आले आहे. स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पुढील तपास करत आहेत.

# तरुणाला रस्त्यात अडवून मारहाण करत पैसे लुटले, बोल्हेगाव फाटा परिसरातील घटना, गुन्हा दाखल

नगर – बोल्हेगाव फाटा परिसरातील नम्रता हॉटेलजवळ एका तरुणाला अडवून त्याला लोखंडी वस्तूने बेदम मारहाण करण्यात आली. तसेच त्याच्या खिशातील ४ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ओम नरे आणि त्याच्या दोन मित्रांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अभिनव सुरेश नवगिरे (वय २५, रा. बोल्हेगाव फाटा) याने फिर्याद दिली आहे. अभिनव हा ४ एप्रिल रोजी सायंकाळी आपल्या खोलीवरून मित्राच्या घरी जात होता. सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास तो नम्रता हॉटेलजवळ पोहोचला असता, एका दुचाकीवरून ओम नरे आणि त्याचे दोन साथीदार तिथे आले. त्यांनी अभिनवला विनाकारण अडवून अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपींनी त्याला लाथाबुक्क्यांनी आणि सोबत आणलेल्या लोखंडी वस्तूने गंभीर मारहाण केली. मारहाण करत असतानाच आरोपींनी अभिनवच्या शर्टच्या खिशातील ४ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले आणि 'तुला जिवंत सोडणार नाही' अशी धमकी देऊन तिथून पळ काढला. या घटनेनंतर जखमी अवस्थेत अभिनवने एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी ओम नरे व त्याच्या दोन मित्रांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार जाधव करत आहेत.

# महापालिकेसमोर विद्यार्थ्याला मारहाण व जिवे मारण्याची धमकी

नगर – रस्त्याच्या वादातून एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याला अडवून त्याला अश्लील शिविगाळ करत चापटीने मारहाण केल्याची घटना अहिल्यानगर महानगरपालिकेसमोर घडली आहे. जास्त बोलला तर काट डालुंगा अशी जिवे मारण्याची धमकी देण्यात आली असून, याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यश बाबासाहेब सानप (वय २१, रा. वसंत टेकडी) हा तरुण आपल्या चारचाकी वाहनाने डीएसपी चौकाकडे जात होता. पावन गणपती मंदिराजवळ मुकुंदनगरमधून एक वाहन आडवे आल्याने वाद झाला होता. त्यावेळी समोरच्या व्यक्तीने हा माझ्या बापाचा रस्ता आहे असे म्हणून वाद घातला. त्यानंतर यश हा पुन्हा आपल्या घराकडे जात असताना आरोपी इम्रान सय्यद व त्याच्या दोन अनोळखी साथीदारांनी त्याला महापालिकेसमोर अडवले. येथे आरोपींनी यश याला शिविगाळ केली आणि त्याच्या कानशिलात लगावली. तू जर जास्त बोलला तर तुला खलास करून टाकू, अशी धमकीही यावेळी देण्यात आली. या प्रकारानंतर घाबरलेल्या यश सानप याने तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी इम्रान सय्यद व त्याच्या दोन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### रिकाम्या पोटी प्या पाणी

सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी पाणी पिणे ही अतिशय सोपी पण प्रभावी सवय आहे. आयुर्वेद आणि आधुनिक आरोग्यशास्त्र दोन्हीही सकाळी पाणी पिण्याचे महत्त्व सांगतात. यामुळे शरीरातील अनेक प्रक्रिया व्यवस्थित सुरू होतात आणि आरोग्याला अनेक फायदे मिळतात. शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर पडतात सकाळी पाणी पिल्याने शरीरातील टॉक्सिन्स बाहेर पडण्यास मदत होते. त्यामुळे शरीर स्वच्छ राहते आणि अनेक आजारांचा धोका कमी होतो. पचनक्रिया सुधारते. रिकाम्या पोटी पाणी पिल्याने पचनसंस्था सक्रिय होते. अन्न पचण्याची प्रक्रिया सुधारते आणि गॅस, ॲसिडिटी, बद्धकोष्ठता यांसारख्या समस्या कमी होऊ शकतात. सकाळी पाणी पिल्याने मेटाबॉलिझम वाढतो. त्यामुळे कॅलरी बर्न होण्यास मदत होते आणि वजन नियंत्रणात ठेवणे सोपे जाते. सकाळी उठल्यावर साधारण १ ते २ ग्लास कोमट पाणी पिणे आरोग्यासाठी चांगले मानले जाते.

## पाककला

### चॉकलेट श्रीखंड

**साहित्य :** चक्का ५०० ग्रॅम, पिठीसाखर १ कप (चॉकलेट गोड असल्याने साखरेचे प्रमाण आवडीनुसार कमी-जास्त करा), कोको पावडर ३-४ मोठे चमचे, डार्क चॉकलेट किंवा मिल्क चॉकलेट ५० ग्रॅम (किसलेले किंवा वितळवलेले), वेलची पूड अर्धा छोटा चमचा (पर्यायी, चवीसाठी) चोको चिप्स सजावटीसाठी

**कृती :** चक्का तयार करा. एका भांड्यात चक्का घेऊन तो हाताने किंवा रवीने छान फेटून घ्या. तो अगदी लोण्यासारखा मऊ झाला पाहिजे. साखर आणि कोको पावडर. आता या चक्क्यामध्ये पिठीसाखर आणि कोको पावडर चाळून टाका. (चाळून घेतल्यामुळे गुठळ्या होत नाहीत). मिश्रण एकजीव करा. हे मिश्रण पुन्हा एकदा छान फेटून घ्या, जेणेकरून चॉकलेटचा रंग सगळीकडे सारखा येईल. चॉकलेट फ्लेवर वाढवा. चव अजून रिच करण्यासाठी त्यात थोडे वितळवलेले चॉकलेट किंवा किसलेले चॉकलेट घाला आणि हलक्या हाताने मिक्स करा. श्रीखंडाला किमान १-२ तास फ्रीजमध्ये थंड होऊ द्या. थंड झाल्यावर त्याची चव अधिक खुलते. सर्व्ह करताना वरून भरपूर चोको चिप्स किंवा बारीक केलेले सुकामेवा (काजू-बदाम) टाका.

## वास्तू

### शौचालयासंबंधी

* जमिनी पेक्षा १-२ फूट उंच शौचालय बांधा
* शौचालयच्या भिंतींचे रंग हलक्या रंगांचे असले पाहिजेत.
* शौचालयमध्ये पाण्याची टाकी, तसेच पूजा खोलीच्या वर किंवा खाली किंवा पलंगाच्या खालच्या जागी ठेवणे टाळावे
* घराच्या मध्यभागी शौचालये टाळावे
* स्वच्छता कारणास्तव शौचालय स्वयंपाकघराजवळ नसावेत
* शौचालय स्नानगृहाच्या दारापुढे कधीही येऊ नये

## सौंदर्य

* मुरुमे सुकवण्यसाठी त्यावर लिंबाचा रस लावा.
* कडुलिंबाचा लेप पाण्यासोबत बनवा आणि मुरुमांवर लावून मुरुमे बरे करा.
* तेलकटपणा आणि मुरुम कमी करण्यासाठी थंड काकडी आणि दह्याचा मास्क बनवा.

## सल्ला

काचेची भांडी चकचकीत निघावी यासाठी पाण्यात लिंबाचा रस पिळा आणि लिंबाच्या सालीने भांडी स्वच्छ करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६

**----, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, ज्येष्ठा २९।५४, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. प्रशासकीय कामे पूर्ण होतील. नवीन कार्याचे स्वरूप बनविण्यासाठी वेळ उत्तम.

**वृषभ** : कौटुंबिक विषयांमध्ये काळजी घ्या. नोकरदार व्यक्तींनी कार्यात सावधगिरी बाळगावी. वादाची स्थिती टाळा.

**मिथुन** : आपल्या कौटुंबिक तणावांचा समस्यांचा प्रभाव आपल्या कार्यावर होऊ देऊ नका. महत्वाकांक्षा वाढतील. शत्रू वर्ग पराभूत होईल.

**कर्क** : यथायोग्य विचार करून कामे करा. कौटुंबिक विषयांसाठी वेळ उत्तम राहील.

**सिंह** : बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल. आरोग्याची काळजी बाळगणे आवश्यक राहील. आपल्या छान वागण्याने इतरांना हवेहवेसे वाटू शकता.

**कन्या** : दिवसाच्या सुरुवातीला काही मोठे कार्य करायची वेळ येऊ शकते पण नंतर आपल्या मनात अनेक प्रकारच्या काळज्या घर करू शकतील.

**तूळ** : मित्रांबरोबर सामुदायिक उपक्रम किंवा पिकनिकच्या रूपात दिवसाचा आनंद घेऊ शकता.

**वृश्चिक** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. अनुकूल वार्ता मिळतील. नोकरीपेशा व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे.

**धनु** : आज पैसे आणि बळाची विशेष भूमिका राहील. नंतर केव्हातरी एखाद्या सामाजिक समारंभात आपल्या विचारांचा परिणाम होईल.

**मकर** : महत्वाच्या बातम्या मिळाल्याने आपण एक सुखद परिस्थितीत आपणास बघाल. नोकरीपेशा व्यक्तींना अनुकूल परिस्थितीत असल्याचे जाणवेल.

**कुंभ** : जवळच्या नात्याचा आनंद घेण्यावर आपले चित्त एकाग्र करा. स्वार्थी बनू नका. प्रेम-प्रसंगात यश मिळेल.

**मीन** : आर्थिक व व्यापारिक मुद्द्यांबद्दल आपले गंभीर विचार श्रेयस्कर ठरतील. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर एकांतात वेळ घालवण्याची आपली इच्छा पूर्ण होण्याची शक्यता आहे.

# शब्दगंध क्र. ७४०३

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ■ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | |
| ९ | | ■ | ■ | ■ | ■ | १० | |
| ११ | | १२ | | ■ | १३ | | ■ |
| ■ | ■ | | ■ | १४ | | | १५ |
| १६ | १७ | | | | ■ | ■ | |
| १८ | | ■ | ■ | १९ | २० | ■ | ■ |
| २१ | | | ■ | २२ | | | |

**आडवे शब्द :-** १) एक दिवंगत समाजसेविका ७) माळ; माला; पराजय; पराभव ८) भांडण सोडविणारे त्रयस्थ मंडळ ९) श्रीमंत; धनवान; सधन १०) वडिलांचा भाऊ; चुलत ११) दाह १३) समुद्राच्या लाटांचा आवाज १४) राजस्थानातील एक भाग १६) सारख्या स्वभावाचा १८) एक धान्य १९) गळा; आवाज २१) अंगावरून वारे जाणे; पक्षघात २२) पांघरण्याचे एक उंची वस्त्र; शाल

**उभे शब्द :-** १) राजाधिराज; सम्राट २) पसरलेला सुगंध ३) करडई, शेंगदाणा, जवस आदी धान्यातील स्निग्धांश ४) नर्मदा नदीचे दुसरे नाव ५) हाक ६) रट्टा; तडाखा; एक प्रकारचे आवेशयुक्त गीत १०) रात्री चमकणारा एक कीटक; सोनकिडा १२) पूर्वेकडील एक प्रगत देश १३) थंड; शीत १४) गायनातील एक राग १५) झाकण असलेले भांडे १६) प्रश्न १७) यजमान; पती; स्वामी २०) फसविणारा; लुच्चा

### शब्दगंध क्र. ७४०२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | चा | न | क | ■ | है | द | र |
| चं | द | न | ब | ट | वा | ■ | म |
| बा | र | ■ | र | ■ | न | व | ल |
| ■ | ■ | ब | स्ता | न | ■ | ज्ञ | ■ |
| ■ | अ | न | न | स | ■ | ■ | कु |
| स | प | क | ■ | ता | ले | व | र |
| ■ | वा | र | स | ■ | प | र | स |
| मो | द | ■ | वा | म | न | ■ | त |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : जेव्हा तुमच्याकडे सारे काही असते तरीही आयुष्य आणखी काही मागत असते त्याचच नाव 'मन:शांती' होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मार्शमॅलो थिअरी काय आहे ?

१९७० साली स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या वॉल्टर मिशेल या अभ्यासकांनी एक प्रयोग केला. ते एका शाळेत लहान मुलांच्या वर्गात गेले आणि प्रत्येक मुलासमोर त्यांनी मार्शमेलो कॅण्डी ठेवली. सोबतच त्यांनी मुलांना सांगितलं की पुढची १५ मिनिटं या कॅण्डीला हात लावायचा नाही. १५ मिनिटं संपली की खायला हरकत नाही. इतकं सांगून ते वर्गाबाहेर निघून गेले. मार्शमेलो कँडी त्या काळातली मुलांची आवडती कॅण्डी होती. इकडे त्यांची पाठ वळली आणि पोरांमध्ये चुळबुळ सुरु झाली. सगळेजण एकमेकांकडे आणि समोरच्या कँडीकडे बघत बसले. काही मिनिटं गेली आणि एका पोरानं कँडी उचलून खाऊन टाकली. मग दुसऱ्यानेही तेच केलं. मग आणखी एकानी.

असं होता होता १५ मिनिटानी वॉल्टर मिशेल पुन्हा वर्गात आले तेव्हा बहुतेक पोरांनी कॅण्डी गट्ट केली होती,अपवाद फक्त सात मुलांचा ! या मुलांनी कॅण्डीला हातही लावला नव्हता. त्यांनी या मुलांची नावं एका यादीत आणि इतर मुलांची दुसऱ्या यादीत लिहून ठेवली. मध्यंतरात काही वर्षं गेली आणि त्यांनी ही मुलं आता काय करतायत हे तपासायला सुरुवात केली. ज्यांनी १५ मिनिटाची सूचना तंतोतंत पाळली होती ती मुलं आता मोठमोठ्या कंपन्यांमध्ये टॉप पोझिशनला होती. त्यांचं लाईफ सेट झालं होतं. ज्या मुलांना कॅण्डी खायचा मोह आवरता आला नाही ती मुलं अजूनही धडपडतच होती किंवा सर्वसाधारण आयुष्य जगत होती. या निरिक्षणावरून एक त्यांनी एक थिअरी मांडली ती अशी जे लोक संयम पाळू शकतात ते आयुष्यात यशस्वी होण्याची शक्यता इतरांपेक्षा जास्त असते.थोडक्यात संयम ही यशाची एक पायरी असते !

आता ही थिअरी १००% लागू पडतेच असंही नाही. काही अभ्यासकांच्या मते कॅण्डी खाण्याचा किंवा न खाण्याचा निर्णय त्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या आर्थिक स्तरावरही अवलंबून होता. ज्यांना कॅण्डी सहज मिळत होती त्यांच्या संयमाला अधिक बळ होतं. त्याखेरीज हा निर्णय त्या मुलांच्या घरच्या शिस्तीचाही भाग होता. असे असले तरी संयम ही यशाची एक पायरी यात काही शंका नाही. मोठमोठ्या कंपन्यांमध्ये ही थिअरी नकळत वापरली जाते हे बऱ्याच जणांना माहिती नसेलही. उदाहरणार्थ : ज्या कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना ऑफीस खर्चासाठी वेगळे क्रेडिट कार्ड देते त्यांच्या खर्चाच्या पॅटर्नचा अभ्यास करून नंतरच त्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्यांचा विचार केला जातो.

### साथीदार

ब्रह्मदत्त नावाचा एक तरुण एका शहरात राहत होता. एकदा त्याला काही कामासाठी दुसऱ्या गावात जावे लागले. त्याची आई म्हणाली, बेटा, एकटा जाऊ नकोस. कोणाला तरी सोबत घेऊन जा.


तरुण म्हणाला, आई, या वाटेवर कोणताही धोका नाही. मी एकटाच जाईन. तरीही, तो निघताना, त्याच्या आईने एक खेकडा पकडला आणि म्हणाली, जर तुला जायचेच असेल तर हा खेकडा सोबत घेऊन जा. एकापेक्षा दोन चांगले. वेळ आल्यावर तो कामी येईल.

तरुणाने त्याच्या आईच्या सल्ल्याला मान्यता दिली आणि खेकडा कापूरच्या पॅकेटमध्ये ठेवला आणि त्याच्या पिशवीत ठेवला. अत्यंत उष्णता होती. चालून चालून त्रासलेला तरुण वाटेत एका झाडाच्या सावलीत झोपला. झोपी गेल्यावर झाडाखालील एका छिद्रातून एक साप बाहेर आला. जेव्हा तो तरुणाजवळ आला तेव्हा त्याला कापूरचा वास आला. तो तरुणाच्या पिशवीत शिरला आणि कापूरची पिशवी तोंडात घालून ते गिळण्याचा प्रयत्न केला. पिशवी उघडली व खेकड्याने लगेचच आपल्या तीक्ष्ण नखांनी सापाला मारले.

तरुणाने डोळे उघडले तेव्हा तो आश्चर्यचकित झाला. कापूरच्या पिशवीजवळ मृत सापाला पाहून त्याला जाणवले की खेकड्याने सापाला मारले आहे आणि त्याचा जीव वाचवला आहे. त्याने विचार केला, जर मी माझ्या आईचे ऐकले नसते आणि तो खेकडा माझ्यासोबत आणला नसता तर मी वाचलो नसतो.

तात्पर्य : साथीदार कोणीही असो, तो नेहमीच गरजेच्या वेळी मदत करतो.

## जीवन का अमृत (भाग १)



आपको सपनों में और उठने के बाद जो अनुभव हुए, उनके लिए आपको सलाह दी जाती है कि आप इन अनुभवों को नजरअंदाज करें। ये अक्सर मन के धोखे साबित होते हैं। रूहानियत इन सब अनुभवों से ऊपर है। जब तक मन का काबू रहता है, वह नामलेवा को रास्ते से हटाने की कोशिश करता है। नामलेवाओं को खाली समय में हमेशा सिद्ध नामों का

जाप करना चाहिए और अपने आपको सत्गुरु की मीठी याद में डुबो कर रखना चाहिए।

इस प्रकार की शांत दिनचर्या, सत्गुरु की दया से आपको पवित्र शब्द का चेतन अनुभव प्रदान करेगी। पवित्र शब्द धुन के साथ ऐसा लगातार संपर्क आपको रूहानी तौर से जागृत करेगा और हर प्रकार

### भजन अभ्यास

का डर खत्म कर देगा ।

१२. छोटी-छोटी बातों से आपके भजन-अभ्यास में विघ्न पड़ना आपके भावुक स्वभाव की वजह से हो सकता है। अवचेतन मन का बर्तन पुराने जन्मों से मिली प्रवृत्तियों, आवेगों और सांसारिक विचारों से भरा होता है। इसको अवश्य ही पूरी तरह से खाली करना होगा, ताकि यह प्रभु-सत्गुरु के प्रति प्रेम और श्रद्धा से भरा जा सके। आदर से भरी नम्रता और स्वार्थ का त्याग उत्तम सद्गुण हैं। आध्यात्मिक जिज्ञासु दिव्य बुद्धिमत्ता को पाते जाते हैं और वे अपने आपको कोई श्रेय नहीं देते, क्योंकि वे सर्वोत्तम दिव्य नशे का आनंद उठाते हैं ।

कार्य ही पूजा है, अतः हर उचित कार्य को आदर सहित, इसी अर्थ में स्वीकार करना चाहिए। आम थकान और कमजोरी भौतिक शरीर के रोजमर्रा के कार्यों की वजह से है, पर आप दिव्य चक्षु पर अपना ध्यान टिकाकर पूर्णतया तनाव मुक्त हो सकते हैं; अंतर में सत्गुरु के पवित्र चरणों में हर प्रकार की चिंता और जिम्मेवारी को अर्पित करके आप अपना एकत्रित हुआ तनाव समाप्त कर सकते हैं। आप अपने सोचने के तरीके में बहुत बदलाव पाएँगे और सत्गुरु की दया से आप बहुत आराम महसूस करेंगे।

१३. मन को इधर-उधर भागने से रोकने का सर्वोत्तम तरीका है, ज्योति के बीच टकटकी लगाकर देखना और पवित्र शब्द धारा को एकाग्रता के साथ सुनना, क्योंकि आंतरिक ध्यान के टूटने पर ही बाहर के फालतू विचार मन में आते हैं और परेशानी पैदा करते हैं। (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

इनसे वह किसी भी प्रकार की कठिनाई का हल ढूँढ सकता है

११. आपको सपनों में और उठने के बाद जो अनुभव हुए, उनके लिए आपको सलाह दी जाती है कि आप इन अनुभवों को नजरअंदाज करें। ये अक्सर मन के धोखे साबित होते हैं। रूहानियत इन सब अनुभवों से ऊपर है। जब तक मन का काबू रहता है, वह नामलेवा को रास्ते से हटाने की कोशिश करता है। नामलेवाओं को खाली समय में हमेशा सिद्ध नामों का सुरेश ओबेरॉय : हे अगदीच बरोबर आहे. तुम्ही असंही म्हणाला आहात की रागाचा आपल्या शरीरातील प्रत्येक पेशीवर परिणाम होतो. शिवानीदीदी : राग हा आपल्या मानसिक अवस्थेवर, शरीरावर आणि नात्यांवर क्रमाक्रमाने परिणाम घडवतो. जे आपल्यावर प्रेम करतात त्यांच्याशी आपलं खूप सुंदर नातं असतं कारण ते आपल्याला स्वीकारार्ह आणि सुखकारक ऊर्जा पाठवत असतात. ज्यामुळे आपल्याला सशक्त वाटतं. अशा प्रकारची ऊर्जा इतरांकडून मिळेलच

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

याची आपण खात्री देऊ शकत नाही पण स्वतःला अशी ऊर्जा देण्याची सुरुवात नक्कीच करू शकतो. आपली ऊर्जा शोषणाऱ्या जुन्या विचारपद्धती आणि सवयी आपण एक एक करून बदलल्या पाहिजेत. आत्म्याकडे बॅटरीच्या दृष्टिकोनातून बघा. आपली ऊर्जा कमी करणारी छिद्रं आपण बुजवली पाहिजेत आणि स्वतःला शक्तिशाली बनवलं पाहिजे. अशा प्रकारे आपलं स्वतःशी असलेलं नातं पुन्हा जिवंत होईल. सुरेश ओबेरॉय : मी स्वतःला शक्तिशाली कसं बनवू? मी नेहमीच शक्तीची सांगड सत्तेशी किंवा वर्चस्वाशी घातली आहे. असं म्हणतात, मन जीते जग जीते.' अर्थ, जो स्वतःच्या मनाला जिंकतो तो जगावर राज्य करतो. शिवानीदीदी : या ओळीतून तर अर्थ आपोआपच व्यक्त होतो

स्वतःच्या मनाला हाताळते आणि जी त्याच्या आहारी जात नाही तीच जगावर राज्य करू शकते.' आपलं विश्व म्हणजे आपली मानसिक स्थिती, शरीर आणि नाती यांचा समावेश असणारा वृक्ष. आतापर्यंत आपण नेहमीच याच्या विरुद्ध गोष्टीवर विश्वास ठेवत आलो की, ज्याच्याकडे चांगलं आरोग्य, चांगली नाती आणि चांगलं करिअर आहे तो आनंदी असतो. आता आपल्याला आधी स्वतःची काळजी घ्यावी लागेल आणि आपली बॅटरी चार्ज करण्यासाठी उपाय करावे लागतील. जर आपल्याला आपली ऊर्जा कमी करायची असेल तर आपल्या मानसिक स्थितीसाठी इतरांना दोष देणं हा त्यासाठीचा सोपा मार्ग आहे.

सुरेश ओबेरॉय : आपल्याला स्वत:वर टीका करायची एवढी सवय आहे की आपण इतरांनाही दोष द्यायला सुरुवात करतो.

शिवानीदीदी : टीका करणं आणि दोष देणं ह्यांत फरक आहे. दोष देणं म्हणजे आपल्या मानसिक स्थितीसाठी इतरांना जबाबदार ठरवणं.

सुरेश ओबेरॉय : जर कुणी चुकीचं वागलं तर आपण अस्वस्थ होणं साहजिकच आहे, हो ना? (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मित्र - मी जास्त बोलत नाही!<br>
दुसरा मित्र - हो, तू तर बोलण्याआधीच<br>
५० स्टेटस ठेवतोस!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतात सर्वाधिक इंटरनेट वापरण्यात कोणत्या राज्याचा तृतीय क्रमांक आहे? - महाराष्ट्र

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### सफरचंद

याचा रोझेसी या कुळात समावेश होतो. हे फळ मूळचे पूर्व युरोपातील आणि पश्चिम आशियातील आहे. भारतात सफरचंदाचे उत्पादन मुख्यत्वे करून काश्मीर, कुलू-मनाली या थंड व डोंगराळ प्रदेशात घेतले जाते.

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : अनेक आजारांमध्ये पथ्यासाठी सफरचंदाचा उपयोग होतो. सफरचंद हे रक्तशुद्धीकारक, पित्तशामक, वायुनाशक व श्रमहारक आहे. मधुर-आम्ल चवीचे, शीत, रुचकर व पौष्टिक गुणधर्माचे असल्यामुळे अतिसार, अर्श, प्रवाहिका, अजीर्ण, मलावष्टंभ, जीर्णज्वर, अरुची, अशक्तपणा, डोकेदुखी, स्थौल्य, विस्मरण, यकृतवृद्धी, मूतखडा, जीर्णकास, तसेच वातविकारांमध्ये सफरचंद हितकर आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : सफरचंदामध्ये अनेक उत्तम पोषणमूल्ये असतात. यात कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस ही खनिजे, तर अ, ब व क जीवनसत्त्वे असतात. तसेच तंतुमय भाग, प्रथिने व आर्द्रता हे घटकही असतात. मधुर-आंबट चवीचे सफरचंद पिकताना त्यातील आंबटपणा कमी होऊन गोडवा वाढतो. यात मॅलिक ॲसिडचे प्रमाण अधिक असून, ते शरीराच्या चयापचय क्रियेस उपयोगी पडते. तसेच यामध्ये पेक्टीन हा महत्त्वाचा औषधी घटक असतो. काही आजारांमध्ये शरीरात अनेक विषद्रव्ये निर्माण होतात. ही अपायकारक विषद्रव्ये शरीराबाहेर काढून त्यांचा निचरा करण्यासाठी व विषद्रव्याची तीव्रता कमी करण्यासाठी गॅलॅक्ट्रॉनिक ॲसिड लागते. ते सफरचंदाच्या गरामध्ये असते. म्हणून सफरचंद खाणे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. अनेकजणांना सफरचंदाचा गर खूप आवडतो. म्हणून ते साल काढून खातात, परंतु अशाप्रकारे साल काढलेल्या सफरचंदाचे पोषणमूल्य कमी होते. कारण ही साल व तिच्या लगतचा गर यात आतील गरापेक्षा जास्त प्रमाणात 'क' जीवनसत्त्व असते. तसेच आतील गराच्या पाच पट 'अ' जीवनसत्त्व सालीमध्ये असते.

उपयोग : १) रुग्णांना आजारपणामध्ये इतर कोणताही आहार देण्यापेक्षा सफरचंद किंवा त्याचा रस दिल्यास काही दिवसांतच त्याची प्रतिकारशक्ती वाढून सर्व विकार दूर होतात. त्याचा अशक्तपणा दूर होऊन ऊर्जानिर्मिती होते व उत्साह संचारतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांड्ळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# योगधारणेवर उभा असलेला नाथ संप्रदाय महाराष्ट्रात भक्ती मार्गाच्या वाटेने रुळला

### मिलिंद महाराज चवंडके यांचे प्रतिपादन



भिंगार येथील नेहरू चौकात श्री कानिफनाथ अस्थाना देवस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री नवनाथ महात्म्य निरूपण सोहळ्यात बोलताना मिलिंद महाराज चवंडके. (छाया – ओम बेरड)

भिंगार – नाथ संप्रदाय प्राचीन व सर्वव्यापी आहे. योगधारणेवर उभा असलेला हा संप्रदाय महाराष्ट्रात भक्तीमार्गाच्या वाटेने रुळला, असे प्रतिपादन मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.

येथील नेहरू चौकात श्री कानिफनाथ अस्थाना देवस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री नवनाथ महात्म्य निरूपण सोहळ्यात ते बोलत होते. दिपक नायकू यांनी स्वागत केले. सागर लालबोंद्रे यांनी परिचय करून दिला. सचिन बिडकर आणि रामभाऊ पांढरे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. कारभारी भिम लालबोंद्रे यांनीही सन्मान केला.

श्री. चवंडके पुढे म्हणाले, नाथ संप्रदाय आणि त्यातील प्रमुख सिद्धांची ओळख लोकमानसात चमत्कारांमुळे व सिद्धीच्या सामर्थ्यामुळे असल्याचे दिसून येते. नाथ संप्रदायाचे मूळ स्वरूप अत्यंत उदात्त आहे. पिंडी ते ब्रह्मांडी हे नाथपंथाचे प्रधान सूत्र. सोहम ही प्रमुख साधना. नाथपंथीय साधना, तत्वज्ञान, आचारधर्म या नाथपंथीय वाङ्मयाचा आढावा घेतल्यास भारतामधील सर्व पंथ आणि साधना मार्गाशी नाथ संप्रदाय या ना त्या कारणाने संबंधित असल्याचे दिसून येते. मठ–मंदिरे–आखाडे–अस्थाने– झुंडी–यात्रा यातून नाथ संप्रदायाचे प्रकर्षाने दर्शन घडते. समाजाच्या उद्धाराची तळमळ दिसून येते. स्त्रियांना मंत्रोपदेश देऊन सन्मानाने नाथ संप्रदायात सामावून घेतले गेले आहे. नाथ पंथाविषयी सुप्त आकर्षण कायम राहिले.

शिव–शक्ती समावेशन, पिंड–ब्रम्हांडाचे ऐक्य, कुंडलिनी जागृती, ध्यान व समाधी हा नाथपंथी आचार. महाराष्ट्रातील नाथपंथ भगवान श्रीकृष्णाच्या उपासनेत म्हणजेच विठ्ठलाच्या उपासनेत एकरूप झाला. यामुळे नाथपंथाचा वैष्णव–धर्माशी असलेला प्राचीन संदर्भ समोर येतो. मच्छिंद्रनाथांना भगवान विष्णूचा अवतार मानले गेले. योग विषयक चमत्कार, सिध्दींचे सामर्थ्य, गुढ विद्या, जडीबुटी, विभूती, भूगर्भात समाधी, किमयेचे नाना प्रकार, अलख निरंजनचा घोष हा नाथपंथीय प्रभाव भारतीय जनमानसावर कायम राहिला. हठयोग, ध्यान योग, राजयोग, लययोग आणि कुंडलिनी जागृतीस नाथपंथात महत्त्वाचे स्थान आहे.

योग परंपरेतून निर्माण झालेला हा नाथ संप्रदाय सिंधू संस्कृतीच्या उदयापासून अस्तित्वात आलेला दिसतो. ज्ञान, धर्म कर्म, भक्ती या चारही वाटा एकत्र येऊन नाथ संप्रदायात मिळतात. नाथपंथी साधक सिद्ध बनून मोक्ष पद प्राप्त करून घेतात. संत ज्ञानेश्वर, संत रामदास स्वामी, संत तुकाराम, संत निळोबाराय या सर्वांनी नाथ संप्रदायाचा उल्लेख मोठ्या आदराने केलेला आहे.

काश्मीर ते कन्याकुमारी आणि द्वारका ते नेपाळ अशा विस्तीर्ण भूभागावर अनेक ठिकाणी नाथपंथाचे अनेक मठ, मंदिर, आखाडे विखुरलेले आहेत. मंत्र योग, लय योग, हठयोग, राजयोग या सहाय्याने नाथयोगी देहालाच शिवरूप बनवतो. कुंडलिनी शक्तीच्या उत्थापनाला नाथ संप्रदायाने अधिक महत्त्व दिले आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली यंत्र साधना नाथ संप्रदायात आजही श्रद्धेने केली जाते. शाबरी मंत्र, तंत्र शाबरी कवच हे गुरुमुखामधूनच घ्यावे लागते. नवनाथांचे तप सामर्थ्य सामावलेले नाथपंथातील सर्व मंत्र हे सिद्ध मंत्रच आहेत. चमत्काराला प्राधान्य न देता सदाचाराचे महत्त्व वाढवण्याचे कार्य नाथांनी केले. परम श्रध्देने नवनाथांना हाक मारल्यास ते निश्चितच सहाय्य करतात, हे श्रध्दावंत आजही अनुभवतात. म्हणूनच गुढीपाडवा सोहळ्यासाठी नाथ क्षेत्री लाखो भाविकांची अलोट गर्दी पहायला मिळते.

नाथ संप्रदायाने आपल्यासमोर ठेवलेले कृतीशील आदर्श समाजाला दिशा देणारे आणि प्रेरणादायीच आहेत. आजच्या ताण–तणावाच्या काळात नाथ शाश्वत आधार देतात. मन:शांती, चिरकाल टिकणारे समाधान, आनंद मिळवून देत आपल्या समोरील सर्व संकट भस्मसात करण्याची किमया नाथ साधतात, असा विश्वास मिलिंद महाराज चवंडके यांनी व्यक्त केला.

नवनाथांच्या अद् भूत जन्मकथांसह त्यांच्या प्रभावी कार्याचे नेमके प्रसंग गूढार्थासह मिलिंद महाराज चवंडके यांच्या रसाळ अमृतवाणीमधून श्रवण करताना भाविक मंत्रमुग्ध होत होते. सलग पाच दिवस दररोज ३।। तास चाललेले श्री नवनाथ महात्म्य निरूपण भाविकांच्या मना–मनात नाथ भक्तीचा महिमा रूजवणारे ठरले.

या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी खंडू फिरोदे, सागर लालबोंद्रे, योगेश नायकू, सचिन बिडकर, दिपक नायकू, अमोल नायकू, शाम काळे, वैभव लालबोंद्रे, अभिषेक नायकू, श्रीकांत दळवी, आनंद नायकू, संदीप मालवंडे, गणेश दळवी, रुपेश लालबोंद्रे, अक्षय गिरमे आदींसह परिसरातील बाल–गोपाळांसह महिलांनी अथक परिश्रम घेतले. सामुदायिक महाआरती आणि महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता भक्तीपूर्ण वातावरणात करण्यात आली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## गृत्समदऋषी विदर्भ – कापूस

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ.रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

ऋषी हा शब्द उच्चारताच आपल्या डोळ्यासमोर उभे राहते ते मंत्र, यज्ञ, याग, उपासना, तप, आश्रम, ज्ञानसाधना, अध्यात्म इत्यादी. भारतीय ऋषींची परंपरा पाहताना लक्षात येते की त्यांनी प्रचंड मोठी ज्ञानसाधना केली, तप केले, विद्याध्ययन आणि अध्यापन केले आणि वैश्विक ज्ञानसृष्टी समृद्ध झाली.

ऋषी हा शब्द एकट्या ऋग्वेदात १३३ वेळा आला आहे. मन्यद्रष्टारः आणि अतिन्द्रियद्रष्टारः म्हणजे ज्यांना मंत्रांचे दर्शन झाले किंवा ज्यांना अतिंद्रियदर्शन झाले तेच ऋषी होय. ज्ञानवत्ता आणि नियमन ही ऋषींची लक्षणे होत. ऋषी हे ज्ञाते होते आणि द्रष्टे होते. त्यांच्या ज्ञातेपणात ज्ञानाबरोबरच विज्ञानाची दृष्टी होती आणि द्रष्टेपणात भौतिक कल्याणाची सृष्टी दडली होती. अनेक ऋषींचे आश्रम ही एकीकडे जशी ज्ञानसाधनेची मंदिरे होती तशाच त्या उत्तम प्रयोगशाळा होत्या.

उत्तमोत्तम प्रयोगातून ते भौतिक जीवनालाही मार्ग दाखवित होते. मध्यंतरी मी एकदा विदर्भात एका कार्यक्रमासाठी गेलो होतो. एका गावात एका छोट्या देवळात हातात कापसाचा धागा घेतलेल्या एका ऋषींचे चित्र होते. कोण होता हा ऋषी ? त्या ऋषीचे नाव होते गृत्समद. त्याचा शोध घेतला तेव्हा लक्षात आले की तो ऋषी महान संशोधक होता. गृत्समद हा ज्ञानी भक्त, कवी, गणित, विज्ञानवेत्ता, कृषी संशोधक आणि सराईत विणकर होता. तो विदर्भवासी होता. कपाशीच्या बीजाचा शोध त्यानेच प्रथम लावला आणि विदर्भ देशात कापसाची लागवड त्यानेच प्रथम केली.

विदर्भात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणावर का येते आणि घेतले जाते याचे मूळ गृत्समदाच्या कपाशी संशोधनावर आधारलेले आहे. कापूस तयार झाला. आता त्याचे काय करायचे. मग तो विणकामात पडला. विणकामातील सर्व क्रिया त्याने अभ्यासल्या आणि धागा काढून कापड विणण्याचा प्रयोग सुरू केला. सूत काढून कापड विणताना तंतु–ब्रह्म (ताणा), ओतु ब्रह्म (कच्चे सूत), तूट ब्रह्म (तुटलेले धागे), ठोक ब्रह्म (मागावर चढल्यानंतरचा धागा) अशा ब्रह्ममय वृत्तीने विणकाम करू लागला. कधी सूत तुटले की तो अस्वस्थ होई. त्यावेळी तो देवाला प्रार्थना करी.

'मां तंतुस् छेदि वयतः।' देवा विणत असताना धागा तुटू देऊ नको. त्या वेळी माझे ध्यान एकाग्र होऊ दे. कापड विणणे ही माझ्या दृष्टीने केवळ बाह्यक्रिया नाही तर ती एक उपासना आहे. सूत तुटत असतानाही माझ्या अंतरमनाचे ध्यान तुटू देऊ नको. त्याची ही प्रार्थनाही सूक्त म्हणून वेदात समाविष्ट झाली. गणितातल्या गुणाकाराचाही शोध लावून बे एके बे। बे दुणे चार असा दोनाचा पाढाच त्याने रचला. ऋषींची भूमिका ही लौकिकापासून दूर जाणारी नाही, लौकिकाला अलौकिकाची जाणीव देणारी असते. कपाशीचा शोध लावून विश्वाला वस्त्र देणारा हा ऋषी खरोखरीच धन्य होय.

– किशोर गांधी

# महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी आशाताई गवळी यांच्या नियुक्तीची मागणी

### अखिल भारतीय सेनेचे निवेदन

नगर – महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी सौ. आशाताई अरुण गवळी यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात संघटनेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ वनारसे यांनी अप्पर जिल्हाधिकारी दळवी यांच्या मार्फत मुख्यमंत्री व राज्यपाल यांना निवेदन पाठविले आहे. यावेळी रावसाहेब काळे पाटील उपस्थित होते.

अलिकडील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणानंतर तत्कालीन महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना राजीनामा द्यावा लागला असून, सध्या हे महत्त्वाचे पद रिक्त आहे. या पार्श्वभूमीवर महिलांच्या संरक्षण, न्याय आणि सक्षमीकरणासाठी सक्षम, निष्ठावान व अनुभवी नेतृत्वाची गरज अधिक तीव्रतेने जाणवत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सौ. आशाताई गवळी या अखिल भारतीय सेनेच्या सरचिटणीस पदावर कार्यरत असून, त्यांनी महिलांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा दिला आहे. महिलांवरील अन्याय, अत्याचार व शोषणाविरोधात त्यांनी ठाम भूमिका घेतली असून अनेक पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रभावी पाठपुरावा केला आहे. याशिवाय, गरजू व होतकरू मुलींचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून त्यांना सक्षम बनविण्याचे कार्यही त्यांनी केले आहे.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध रोजगाराभिमुख उपक्रम राबविणे, समाजातील दुर्बल घटकांमध्ये जागृती निर्माण करणे आणि महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव करून देणे, तसेच स्थानिक स्तरावर महिलांच्या सुरक्षेसाठी संघटनात्मक बळ उभे करण्याचे कार्य गवळी यांनी सातत्याने केले आहे.

आजच्या परिस्थितीत महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असताना त्यावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी आणि पीडितांना त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी महिला आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे या पदावर कर्तृत्ववान, निर्भीड आणि सामाजिक बांधिलकी असलेल्या व्यक्तीची नियुक्ती होणे अत्यावश्यक असल्याचे अखिल भारतीय सेनेने स्पष्ट केले आहे.

सक्षम नेतृत्वाची नियुक्ती न झाल्यास समाजात चुकीच्या प्रवृत्तींना चालना मिळून महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री यांनी सौ. आशाताई अरुणभाऊ गवळी यांच्या कार्याचा विचार करून त्यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदी लवकरात लवकर नियुक्ती करावी, अशी मागणी अखिल भारतीय सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.



महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी सौ. आशाताई अरुण गवळी यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय सेनेच्या वतीने संघटनेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ वनारसे यांनी अप्पर जिल्हाधिकारी दळवी यांच्या मार्फत मुख्यमंत्री व राज्यपाल यांना निवेदन पाठविले आहे.

# राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रतिभा खैरनार यांची निवड



नगर – छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी महिला साहित्यिक प्रतिभा खैरनार यांची निवड करण्यात आली.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने निमगाव वाघा (ता. नगर) येथे १७ मे रोजी होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर नुकतीच संयोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत खैरनार यांची निवड करण्यात आली. या बैठकीसाठी ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे, गणराज प्रकाशनचे प्रा. गणेश भगत, कवयित्री सरोज आल्हाट, बाळासाहेब देशमुख, भाऊसाहेब कदम, कवी गीताराम नरवडे, विशेष सरकारी वकीलड. सुरेश लगड, निवृत्ती महाराज कानवडे, राजेंद्र घोडके, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, बाळासाहेब मुनतोडे आदी उपस्थित होते.

प्रतिभा खैरनार या ता. नांदगाव (जि. नाशिक) येथील साहित्यिका असून, त्यांचे विविध काव्यसंग्रह व कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या काव्यसंग्रह व कथासंग्रहाला विविध पुरस्कार देखील मिळालेले आहेत. साहित्य क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांची या संमेलनाच्या अध्यक्षपदी संयोजन समितीच्या वतीने एकमताने निवड करण्यात आली.

या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात राज्यभरातील नवोदित तसेच ज्येष्ठ साहित्यिक सहभागी होणार असून साहित्य क्षेत्रातील विविध विषयांवर विचारमंथन होणार आहे. यावेळी काव्य संमेलनाचेही आयोजन करण्यात आले असून अनेक कवी व कवयित्री आपल्या रचना सादर करणार आहेत. तसेच छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित पोवाडे व कविता सादर करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले जाणार आहे. तसेच या संमेलनात समाजातील विविध क्षेत्रांत निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी विशेष पुरस्कार देखील प्रदान करण्यात येणार आहेत.

या संमेलनासाठी ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे व बेलापूर महाविद्यालयाच्या प्राचार्या गुंफाताई कोकाटे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# युवकांना सकारात्मक दिशेने प्रवृत्त करण्यासाठी क्रीडा हे अत्यंत प्रभावी साधन

### सत्यजीत संतोष यांचे प्रतिपादन; मेरा युवा भारततर्फे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात, युवक–युवतींनी सहभाग नोंदवत सांघिक व वैयक्तिक बक्षिसे पटकाविली



युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालयाच्या मेरा युवा भारत या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये युवक–युवतींनी सहभाग नोंदवत सांघिक व वैयक्तिक बक्षिसे पटकाविली.

नगर – मेरा युवा भारत या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे देशातील युवकांना सकारात्मक दिशेने प्रवृत्त करणे आणि त्यांच्या अंगभूत गुणांना वाव देणे. क्रीडा हे त्यासाठी अत्यंत प्रभावी साधन आहे. ग्रामीण व शहरी भागातील युवकांना एकत्र आणून त्यांना समान संधी देणे हे आमचे ध्येय आहे. खेळातून केवळ शरीरच नव्हे तर मन आणि विचारही मजबूत होतात. त्यामुळे युवकांनी मोबाईल व सोशल मीडियापेक्षा खेळाच्या मैदानाकडे अधिक लक्ष देण्याचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष यांनी आवाहन केले.

युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालयाच्या मेरा युवा भारत या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. शहरातील न्यू आर्टस्, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयाच्या जिमखाना मैदानावर या स्पर्धा पार पडल्या. विविध क्रीडा प्रकारांमध्ये युवक–युवतींनी सहभाग नोंदवत सांघिक व वैयक्तिक स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत बक्षिसे पटकावली.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष, महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल आठरे, जिमखाना चेअरमन अनंत पंडित, तसेच शरद मगर, धन्यकुमार हराळ, रमेश गाडगे, श्रीकृष्ण मुरकुटे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते.

उपप्राचार्य अनिल आठरे म्हणाले की, आजच्या या क्रीडा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमधील उर्जा, आत्मविश्वास आणि संघभावना स्पष्टपणे दिसून येत आहे. शिक्षणाबरोबरच क्रीडा हे व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे माध्यम आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती तर वाढतेच, पण मानसिक बळ, निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुणही विकसित होतात. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी खेळ आत्मसात केला पाहिजे. या स्पर्धा केवळ जिंकण्यासाठी नसून, सहभागातून शिकण्यासाठी आणि स्वतःला घडवण्यासाठी असल्याचे त्यांनी सांगितले.

**वैयक्तिक स्पर्धांचे निकाल :** १०० मीटर धावणे (मुली) : प्रथम – रजनी मिश्रा, द्वितीय – आरती जवरे, तृतीय – रूपाली दानवे., २०० मीटर धावणे (मुले) : प्रथम – साहिल खाटेकर, द्वितीय – महेश माळी, तृतीय – आदित्य माळी., गोळा फेक (मुली) : प्रथम– ऋतुजा जवरे, द्वितीय– पल्लवी रोकडे, तृतीय– रिया शर्मा., गोळा फेक (मुले) : प्रथम– ओम टकले, द्वितीय– प्रतीक परभणे, तृतीय– तुषार आजबे

**सांघिक स्पर्धांचे निकाल :** खो–खो : प्रथम – रिया शर्मा व संघ (ग्रुप), द्वितीय – सोनाली नायका (बी ग्रुप)., व्हॉलीबॉल : प्रथम – छत्रपती ग्रुप, द्वितीय – वीरेंद्र क्लब., कबड्डी : प्रथम – सहयोग क्रीडा मंडळ, द्वितीय – वाडिया पार्क

स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाचे सहकार्य लाभले.

# सांस्कृतिक उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना

### प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर यांचे प्रतिपादन, डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात रिदम–२०२६ सांस्कृतिक महोत्सव उत्साहात



डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात रिदम २०२६ सांस्कृतिक महोत्सवात विद्यार्थ्यांनी बॉलीवुड पात्रांचे प्रभावी सादरीकरण करून सर्वांची मने जिंकली (छाया – विजय मते)

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित करण्यात आलेला रिदम–२०२६ हा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. महोत्सवाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच सांस्कृतिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. नवथर पुढे म्हणाले की, अशा प्रकारच्या सांस्कृतिक महोत्सवांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. आत्मविश्वास, संघभावना, सर्जनशीलता आणि नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी हे व्यासपीठ अत्यंत उपयुक्त ठरते. शिक्षणासोबत कला आणि संस्कृतीचा समतोल साधल्यास विद्यार्थी सर्वांगीण प्रगती करू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

महोत्सवाची सुरुवात ग्रुप डे / मिसमॅच डे या आकर्षक उपक्रमाने झाली. विद्यार्थ्यांनी एकसारख्या रंगातील तसेच वेगवेगळ्या मिसमॅच वेशभूषेत सहभाग घेत रंगत आणली. त्यानंतर साजऱ्या झालेल्या बॉलिवूड डे मध्ये विद्यार्थ्यांनी विविध बॉलिवूड पात्रांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

तसेच हॅलोविन डे / ब्लॅक अँड व्हाइट डे / साडी व टाय डे या विविध थीम्समुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. विद्यार्थ्यांनी कल्पक आणि सर्जनशील वेशभूषा सादर करत महोत्सवात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. महोत्सवाचा समारोप ट्रॅडिशनल डे ने झाला. पारंपरिक पोशाखात सजलेल्या विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवले.

सर्व कार्यक्रम महाविद्यालय परिसरातील नासा पॉईंट येथे पार पडले. स्नेहसंमेलन समन्वयक म्हणून प्रा. सुनील मांढरे यांनी काम पाहिले. शिक्षक समन्वयक म्हणून डॉ. सौ. के. डी. विधाते, प्रा. सौ. प्राची मोरे व प्रा. सौ. पूजा काजळे यांनी मोलाचे योगदान दिले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून सिद्धार्थ हाके, स्नेहा आहिरे, राज देशमुख, रोहित फेगडे, पूजा बनसोडे, ओंकार जोशी, स्वेता सोनावणे व ओम रक्षे यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

याशिवाय डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनील कल्हापुरे तसेच प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर यांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील तसेच चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

# गजराजनगरला हनुमान जन्मोत्सवाची सांगता



गजराजनगर येथील हनुमान जन्मोत्सवाची सांगता महाप्रसादाने झाली. दरवर्षी हनुमान जन्मोत्सवाला महाप्रसादासाठी सहकार्य करणारे अन्नदाते हेमंतभाई पटेल यांचा यावेळी शिवराजे मित्र मंडळाचे वतीने सन्मान करण्यात आला. (छाया – विजय मते)

नगर – छत्रपती संभाजीनगर रोडवरील गजराजनगर येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या हनुमान मंदिरात जन्मोत्सव साजरा करून महाप्रसादाने उत्साहात भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. सालाबाद प्रमाणे यंदाही येथील युवकांनी प्रवरा संगम येथून कावडीने पाणी आणून जन्मोत्सवापूर्वी श्री हनुमान मूर्तीस जलाभिषेक केला. युवकांचे श्रद्धास्थान असलेल्या या श्री हनुमानाची उपासना करून भक्ती भावाने सूर्योदयाला जन्मोत्सवाचे सुमारास भक्तांनी पुष्पवृष्टी करून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी नागरिक उपस्थित होते.

गजराजनगर येथील शिवराजे मित्र मंडळाचे कार्यकर्ते, तरुणांनी कावडीने पाणी आणून श्री हनुमान मूर्तीस जलाभिषेक केला.

दरवर्षी हनुमान जयंती उत्सवाला महाप्रसादाचे आयोजन आसाम टी कंपनीचे हेमंतभाई पटेल स्वतः करत असतात त्यानिमित्त त्यांचा शिवराजे मित्र मंडळाचे वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी नागरिक उपस्थित होते. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. महाप्रसादाने हनुमान जन्मोत्सवाचे सांगता करण्यात आली.

# मालापारायण महोत्सव सुरू


विवेक जोशी

नगर – प्राचीन ज्ञानाचे रक्षण व प्रसार करण्याच्या उद्देशाने आळंदी येथील आध्यात्मिक प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने आयोजित शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखा माला पारायण महोत्सव शुक्रवारपासून सुरू झाला असून हा महोत्सव १० एप्रिल पर्यंत सकाळी ८ ते ११ या वेळेत पुण्यातील लक्ष्मी रस्त्यावरील बेलबाग संस्थानचे श्री विष्णू मंदिरात पार पडत आहे.

### काय आहे मालापारायण?

दोन पदांचा क्रम त्याच दोन पदांचा व्युत्क्रम म्हणजे उलट म्हणणे पुनश्च: पूर्ववत क्रम उच्चारणे यालाच संक्रम असे म्हणतात त्यानंतर प्रथम पद सोडून द्वितीय पद जोडून क्रमशः क्रम, व्युत्क्रम, संक्रम या क्रमाने पदांची पुष्प माला गुंफणे यालाच मालापारायण असे म्हणतात. सौष्ठवौदार्ययुक्त विशेषशालिनी अशी वाणी व लोकोत्तरविलक्षण मेधाशक्ती यांच्या समन्वयामुळे सिध्द होणारे हे माला पारायण आहे.

एकाकी अष्टविकृती पारायणे मधल्या काही काळात खंडीत झाली होती त्या पारायणांची पुनश्च सुरुवात कै. विश्वनाथ केशव जोशी यांनी केली होती. त्यांची पूर्तता त्यांचा मुलगा वेदमूर्ती विवेक जोशी हे करीत आहेत. तसेच पारायणाचे निरीक्षत्व घनपाठी वे.मू. किरण पाठक करत आहेत

या वेदश्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन न्याय शास्त्र चुडामणी अशोक शास्त्री कुलकर्णी यांनी केले आहे.

१० एप्रिल रोजी सकाळीच ८ वाजता मिरवणूक निघणार आहे व पुणे येथील केसरीवाडा येथे सकाळी १० ते दुपारी ३ सत्कार समारंभ होणार आहे अशी माहिती वे. शा.सं.सागर कुलकर्णी गुरुजी यांनी दिली आहे.

# नगर जिल्ह्यात काँग्रेसचे ‘संघटन सृजन अभियान’

## मे महिन्यात पदाधिकाऱ्यांची निवड


नगर जिल्ह्यात काँग्रेसचे ‘संघटन सृजन अभियान’ विषयी माहिती देताना पक्ष निरीक्षक शरद राऊत.

नगर – काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर जिल्ह्यात व्यापक ‘संघटन सृजन अभियान’ राबविण्यात येत असून हे अभियान १९ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे. या अभियानाच्या पार्श्वभूमीवर मे महिन्यात जिल्ह्यात नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती पक्ष निरीक्षक शरद राऊटं यांनी दिली.

या वेळी मुंबईचे निरीक्षक मुजफ्फर हुसेन, शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण, जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, माजी जिल्हाध्यक्ष करण ससाणे, शहर ब्लॉक अध्यक्ष फिरोज खान, प्रताप शेळके, संपतराव म्हस्के, उपाध्यक्ष बाळासाहेब भंडारी, अण्णासाहेब डावखर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष मोहसीन शेख यांच्यासह नगर दक्षिण कमिटीचे तालुकाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शरद राऊटं म्हणाले की, काँग्रेस पक्षाने देशभर संघटन सुदृढ करण्यासाठी ‘संघटन सृजन अभियान’ राबविण्याचा निर्णय घेतला असून त्याची सुरुवात गुजरातमधून करण्यात आली आहे. सध्या या अभियानाचा सातवा टप्पा सुरू असून पदाधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन पक्षाविषयी त्यांची मते जाणून घेतली जात आहेत. कार्यकर्त्यांच्या अपेक्षा, आवश्यक बदल आणि संघटनात्मक सुधारणा यावर थेट चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागावर विशेष भर देत ब्लॉक कमिटी स्तरापर्यंत जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाणार आहे. राज्यातील निवडणुकांमुळे यापूर्वी हे अभियान राबविता आले नव्हते. मात्र आता २ एप्रिलपासून नगर जिल्ह्यात अभियानाला सुरुवात झाली असून १९ एप्रिलपर्यंत ते सुरू राहणार आहे. पक्ष बळकटीकरण हा या अभियानामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्ह्यातील नव्या पदाधिकाऱ्यांसाठी सहा नावे पक्षश्रेष्ठींना पाठविण्यात येणार असून त्यामध्ये एका महिलेचा समावेश असेल. तसेच एक पद अनुसूचित जमाती (एसटी) व एक इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. अंतिम निर्णयानंतर पक्षाकडून नव्या नियुक्त्या जाहीर केल्या जातील, असेही ते म्हणाले.

राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना राऊटं यांनी भाजपवर टीका करत, आज अनेक जण काँग्रेसमधून भाजपमध्ये गेले असले तरी खरी भाजप कोणती हे शोधण्याची वेळ आली आहे, असे म्हटले. मात्र काँग्रेस सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राहुल गांधी यांनी देशभर संघटन उभारणीवर भर दिला होता, त्याच धर्तीवर पुन्हा पक्ष संघटन मजबूत करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. कन्याकुमारी ते काश्मीर पदयात्रेद्वारे लाखो लोक पक्षाशी जोडले गेले होते. त्याचप्रमाणे या अभियानातून नव्याने पक्षबांधणी केली जाणार असल्याचा विश्वास राऊट यांनी व्यक्त केला.



नालेगाव येथील गाडगीळ पटांगण येथे अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता ह.भ.प. प्रभाकर महाराज कावले यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. शेजारील छायाचित्रात श्री हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहामध्ये उपस्थित असलेले आ. संग्राम जगताप. (छाया : लहू दळवी)

# नालेगावात अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

## प्रभाकर महाराज कावले यांच्या काल्याच्या कीर्तनाने रंगला सोहळा

नगर – नालेगाव येथील गाडगीळ पटांगण येथे श्री हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता ह.भ.प. प्रभाकर महाराज कावले यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. सात दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्यात हरिनाम, अभंग, कीर्तन व संतविचारांनी परिसर दुमदुमून गेला होता.

कीर्तन सेवेत ह.भ.प. प्रभाकर महाराज कावले यांनी तुझीये संगती झाली आमुची निश्चिंती या अभंगाच्या माध्यमातून भक्ती, ज्ञान आणि भगवंताच्या संगतीचे महत्त्व अधोरेखित केले. देव आणि गोपाळ यांच्यातील संवादातून त्यांनी भक्तीतील निश्चिंती, अज्ञानाचा नाश आणि पाप–पुण्याच्या बंधनातून मुक्त होणाऱ्या जीवनाचे तत्त्वज्ञान उलगडून सांगितले.

भगवंताच्या संगतीत मिळणारा निरपेक्ष आनंद हा सर्वश्रेष्ठ असून तोच खरा काला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काला म्हणजे जीवनाची परिपूर्णता, भक्तीचा सोहळा आणि हरिनामाच्या माध्यमातून अनुभवता येणारा सर्वोच्च आनंद आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. मनुष्य देह हा या आनंदासाठीच लाभलेला असून भगवंताच्या संगतीतच खरे सुख प्राप्त होते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून संतांचे विचार व कार्य समाजापर्यंत पोहोचते. अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाज सुसंस्कृत होतो व आपल्या संस्कृतीचे जतन होते. नालेगाव येथे माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल यांच्या माध्यमातून गेल्या ३४ वर्षांपासून सुरू असलेली ही कीर्तन सेवा अत्यंत कौतुकास्पद असून त्यातून वारकरी परंपरा पुढील पिढीकडे पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत आहे.

दत्तात्रय मुदगल यांनी सांगितले की, सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात पार पडला. सप्ताहाच्या सांगतेनिमित्त ह.भ.प. प्रभाकर महाराज कावले यांचे काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.

सोहळ्यास भाविकांची उपस्थिती होती. टाळ–मृदंगाच्या गजरात, अभंग–कीर्तनाच्या सुरावटीत आणि हरिनामाच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

# बौद्ध संस्कार संघाच्या वतीने नगरमध्ये १४ एप्रिल रोजी ‘भीमपहाट’चे आयोजन

## जालिंदर बोरुडे, स्मिता रुपवते व डॉ. तारकेश्वर वानखडे यांना ‘भीमपहाट सन्मान’ जाहीर



नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बौद्ध संस्कार संघाच्या वतीने १४ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता ‘भीमपहाट’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. चेतना लॉन्स, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे होणाऱ्या या कार्यक्रमात भीमगीतांच्या सुरांनी परिसर भारावून जाणार असून, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींना ‘भीमपहाट सन्मान पुरस्कार’ देऊन गौरविण्यात येणार आहे.

या उपक्रमाबाबत माहिती देताना आयोजक भाऊसाहेब देठे यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर घडविणे, तसेच समाजातील प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा ‘भीमपहाट’ कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

यावर्षी जालिंदर बोरुडे, आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये कार्यरत असणाऱ्या मुख्य परिचारिका स्मिता मनोरंजन रुपवते, तसेच गुणे शास्त्री आयुर्वेदिक महाविद्यालयाचे सहाय्यक प्रा. कान, नाक, घसातज्ञ डॉ. तारकेश्वर सुखदेव वानखडे यांना ‘भीमपहाट सन्मान पुरस्कार’ प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती देठे यांनी दिली. त्यांच्या कार्याचा गौरव करून समाजात सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न या निमित्ताने करण्यात येणार आहे.

कार्यक्रमात सांस्कृतिक पर्वाचीही रेलचेल पाहायला मिळणार असून ‘आर्केस्ट्रा संगीत सितारे’ परिवाराच्या वतीने सादर होणाऱ्या भीमगीतांच्या मैफलीत गायक–निवेदक विनय कसबेकर यांच्यासह महाराष्ट्रातील गायक नरेश बडेकर, अतुल थोरात, शाहीर वसंत डंबाळे, गायिका पल्लवी बोरुडे, तसेच गायिका अशा वडागळे आदी कलाकार आपल्या सादरीकरणातून उपस्थितांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

पहाटेच्या शांत, प्रसन्न वातावरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी भारलेली ही ‘भीमपहाट’ नागरिकांसाठी एक प्रेरणादायी पर्व ठरणार असून, उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन बौद्ध संस्कार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.


जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान ट्रस्ट, अहिल्यानगर या संस्थेचा १२ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. ट्रस्टच्या वतीने संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशाला येथील विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे जार भेट देण्यात आले.

# संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेतील विद्यार्थ्यांना दिले पिण्याच्या पाण्याचे जार

नगर – जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान ट्रस्ट, अहिल्यानगर या संस्थेचा १२ वा वर्धापन दिन १ एप्रिल रोजी उत्साहात आणि सेवाभावी उपक्रमाने साजरा करण्यात आला. या मंगल दिनाचे औचित्य साधून ट्रस्टच्या वतीने संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशाला येथील विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे जार भेट देण्यात आले.

सध्या वाढत्या उन्हाची तीव्रता पाहता शालेय विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये आणि त्यांना स्वच्छ, शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने ट्रस्टने हा उपक्रम राबवला.

वर्धापन दिनाचे अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजेसाठी पुढाकार घेण्याच्या ट्रस्टच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गेल्या बारा वर्षांपासून जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान ट्रस्ट अहिल्यानगर शहरात विविध धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवत आहे. सेवा हीच ईश्वर भक्ती मानून संस्थेने नेहमीच गरजूंच्या मदतीला प्राधान्य दिले आहे. आजच्या या उपक्रमाने संस्थेच्या सामाजिक कार्याचा आलेख अधिक उंचावला आहे.

याप्रसंगी संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेच्या प्रशासनाकडून ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची आणि सुविधेची दखल घेतल्याबद्दल आम्ही ट्रस्टचे ऋणी आहोत, अशा भावना शाळेच्या मुख्याध्यापकांनी व्यक्त केल्या.

या कार्यक्रमास जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य, तसेच शाळेचे शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# अहिल्यानगर शहरासाठी प्रगतीचे व्हिजन असणे अत्यंत महत्त्वाचे

## उपमहापौर धनंजय जाधव


उपमहापौरपदी निवड झाल्याबद्दल हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात धनंजय जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी सदैव तत्पर असून पुढील काही वर्षाचे व्हिजन समोर ठेवून आम्ही सर्वजण काम करणार आहोत. शहराचा विकास हा एकमेव हेतू डोळ्यासमोर ठेवून शहरवासीयांच्या प्राथमिक गरजांसोबत शहरात तरुणांना समोर ठेवून नाविन्यपूर्ण उद्योग आणि उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे उपमहापौर धनंजय जाधव यांनी सांगितले. सर्वांना सोबत घेऊन केवळ नगर विकास हाच एक ध्यास मनाशी बाळगून हे पद स्वीकारल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

उपमहापौरपदी निवड झाल्याबद्दल हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात धनंजय जाधव यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्यांनी विद्यालयाच्या ए आय कॉम्प्युटर लॅब ला भेट दिली. नव्याने नूतनीकरण करून सुरू करण्यात आलेल्या कम्प्युटर लॅबचे आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेली विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे पाहताना उपमहापौर धनंजय जाधव यांनी ए आय हे भविष्य असून, शिक्षण क्षेत्रात ए. आय. चा उपयोग अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. यासाठी शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणामुळे त्यांचे करिअर आणि भविष्य हे नक्कीच उज्वल असेल असे प्रतिपादन केले.

स्कूल कमिटीचे चेअरमन अजित बोरा यांनी धनंजय जाधव यांना पुढील कामासाठी शुभेच्छा देतानाच जाधव हे नेहमी आमच्या शाळेच्या प्रत्येक उत्तम कार्यात पाठीशी असल्याचे सांगितले. त्यांचे हिंद सेवा मंडळाशी कौटुंबिक नाते असून शाळेसाठी, संस्थेसाठी संपूर्ण कुटुंब नेहमीच अग्रेसर असते हे सांगितले.

हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी आपल्या शुभेच्छा मध्ये धनंजय जाधव हे नगरमध्ये एक आदर्श नेतृत्व असल्याचे सांगून सर्वांना सामावून घेणार व्यक्तिमत्व आहे. त्यांचे नेहमीच हिंद सेवा मंडळाला सहकार्य असते असे आवर्जून सांगितले.

विविध ॲक्टिव्हिटी विद्यार्थ्यांनी कराव्यात यासाठी स्वतंत्र ॲक्टिव्हिटी हॉल, लायब्ररी आणि विद्यार्थी रमतील, खेळतील अशी जिम, विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र विद्यालयात सुरू करणार असल्याचे मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी स्वागत करताना सांगितले.

यावेळी शालेय समिती सदस्य संजय मुदगल, ईश्वर बोरा, ॲड. दीपक शर्मा, सचिन चोपडा, ज्योतीताई कुलकर्णी, मुख्याध्यापक अशोक डोळसे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, शिक्षक प्रतिनिधी दीपक आरडे, सौ. दिपाली लगड, शिक्षकेतर प्रतिनिधी गोवर्धन पांडुळे आदी उपस्थित होते.

विद्यालयात ५० विद्यार्थ्यांचा सक्षम एनसीसी ग्रुप, विविध कलागुणांना वाव देणारे कलादालन याचबरोबर विविध खेळात यश मिळविण्यात अग्रेसर असणारा क्रीडा विभाग विद्यालयात उत्तम काम करत असल्याचे पर्यवेक्षिका सौ. नंदा कानिटकर यांनी आपल्या आभार प्रदर्शनात सांगितले.

कार्यक्रमासाठी विनोद जोशी, संजय शेकडे, चंद्रशेखर वाघ, अमोल कदम, आनंद जोशी, सौ. निमा राहिंज, सौ. वृषाली जोशी, सौ. क्रांती मुंदानकर, सौ. वाघमारे, भाऊसाहेब बडगे, पालक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# पावसाची सर अन् जय जगदंबाच्या नाम गजरात केंडगाव वैष्णवनगरला योगेश्वरी देवीचा पालखी सोहळा उत्साहात


केडगाव च्या वैष्णवनगर मध्ये चैत्र पौर्णिमेनिमित्त काढण्यात आलेल्या योगेश्वरी देवीच्या पालखी सोहळ्यात सहभागी झालेले भाविक.

नगर – दाटलेले आभाळ, रिमझिमणारा पाऊस व त्यात जय जगदंबाच्या अखंड नाम गजरात वाद्याच्या ठेक्यावर ताल धरून नाचणारे भक्तगण. हे औचित्य होते ते चैत्र पौर्णिमेनिमित्त केडगाव च्या वैष्णवनगर मध्ये हरिद्वार च्या शांतिकुंज अखिल विश्व गायत्री परिवाराच्या वतीने योगेश्वरी देवीच्या मंदिरात आयोजित केलेल्या तीन दिवसीय उत्सवाचे. हा सोहळा १ ते ३ एप्रिल असा साजरा करण्यात आला.

गुरुवारी सायंकाळी मारुती मंदिरा पासुन देवीच्या पालखीची मिरवणुक काढण्यात आली यावेळी ठिकठिकाणी रांगोळी काढून व सडे शिंपडून स्थानिक रहिवाशांनी पालखीचे स्वागत केले. या मिरवणुकीत चांदा येथील चैतन्य कानिफनाथ सेवा मंडळाच्या वाद्य पथकाने सादर केलेल्या ’कडे बांगडी डाव’ या वादनाने केडगावकरांचे लक्ष वेधून घेतले. हे उत्सवाचे ४१ वे वर्ष असल्याचे व गुरुवारी सकाळी नवकुंडी गायत्री महायज्ञ करण्यात आला अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक चंद्रकांत देशमुख यांनी दिली.

सायंकाळी ५ वाजता वैष्णवनगर च्या मारुती मंदिरा पासुन देवीच्या पादुकांची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीनंतर रात्री महाप्रसदाचे वाटप करण्यात आले. यावेळी भाविक उपस्थित होते.

उत्सवाच्या पहिल्या दिवशी बुधवारी कुमारिका, बटु व सुवासिनी पुजन करण्यात आले. सायंकाळी स्वरमंदिर भजनी मंडळ व राजलक्ष्मी भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम झाला. गुरुवारी पालखी सोहोळ्यानंतर रात्रभर देवीचा जागर करण्यात आला. शुक्रवारी पहाटे या सोहळ्याची सांगता करण्यात आली. या सोहळ्यासाठी अनेक भाविक भक्तांनी परिश्रम घेतले. पुजेचे अधिपत्य संदीप जोशी यांनी केले. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप उपस्थित होते.



# अहमदनगर पहिली मंडळी (काँग्रॅग्रीशनल) ह्युम मेमोरियल चर्चच्या वतीने गुड फ्रायडे (उत्तम शुक्रवार) निमित्त विशेष भक्ती कार्यक्रमाचे आयोजन

अहमदनगर पहिली मंडळी (काँग्रीगेशनल) ह्युम मेमोरियल चर्चच्या वतीने गुड फ्रायडे (उत्तम शुक्रवार) निमित्त विशेष भक्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या भक्तीचे सूत्रसंचालन मंडळींचे आचार्य रेव्ह. डॉ. सनी पी. मिसाळ यांनी केले. यावेळी कोल्हापूर चर्च कौन्सिलचे रेव्ह. श्रीकांत बी. पठाणे यांनी प्रार्थना व उपदेश करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मंडळीचे सेक्रेटरी नंद प्रकाश शिंदे, खजिनदार प्रकाश सूर्यवंशी, अमोल काळे, सागर घोडके यांच्यासह विश्वस्त मंडळी व तरुण संघ व ख्रिस्त बांधव उपस्थित होते.

# अर्थजगत

भारतीय आयुर्विमा क्षेत्रात सध्या एक मूलगामी स्थित्यंतर पाहायला मिळत आहे. इन्शुरन्स अवेअरनेस कमिटीचे (आयएसी–लाईफ) अध्यक्ष कमलेश राव यांच्या मते, आयुर्विम्याकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन आता पूर्णपणे बदलला आहे. पूर्वी विमा म्हणजे केवळ मृत्यू पश्चात कुटुंबाला मिळणारे आर्थिक संरक्षण असे मानले जात असे, परंतु आता तो निवृत्तीनंतरचे उत्पन्न, बचत आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे.

## आयुर्विमा क्षेत्रातील स्थित्यंतर



आकडेवारीनुसार, विमा कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या एकूण परताव्यापैकी तब्बल ९२ टक्क्यांहून अधिक रक्कम ही पॉलिसीधारकांना त्यांच्या हयातीतच 'लिव्हिंग बेनिफिट्स' म्हणून मिळत आहे. ही बाब विमा क्षेत्रातील मॅच्युरिटी आणि बदलत्या ग्राहक मानसिकतेचे निदर्शक आहे.

विम्याच्या या बदलत्या स्वरूपामुळे 'डेथ कव्हर' ही संकल्पना आता मागे पडत असून 'जीवन लाभ' केंद्रस्थानी येत आहेत. पॉलिसीधारकांना मिळणारा हा मोठा परतावा केवळ जुन्या पॉलिसींच्या परिपक्वतेमुळे नसून, तो एक रचनात्मक बदल आहे. अगदी कोव्हिडच्या काळातही हयातीतील लाभांचे प्रमाण ९० टक्क्यांच्या आसपास होते. आजची कुटुंबे घरांचे हप्ते, मुलांचे शिक्षण आणि स्वतःची निवृत्ती यांसारख्या उद्दिष्टांसाठी विम्याचा वापर 'वेल्थ रिझर्व्हायर' म्हणजेच संपत्तीचा साठा म्हणून करत आहेत. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सरेंडर आणि विथड्रॉवलच्या माध्यमातून बाहेर पडलेली २.३३ लाख कोटी रुपयांची रक्कम ही आर्थिक टंचाईपेक्षा नियोजित जीवनचक्र खर्चाचा भाग असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

मात्र, या सकारात्मक बदलासोबतच एक गंभीर चिंतेची बाब म्हणजे शुद्ध संरक्षणाबाबतची अनास्था होय. एकूण परताव्यामध्ये मृत्यू दाव्यांचे प्रमाण ८ टक्क्यांपेक्षा कमी असणे हे दर्शवते की, भारत अजूनही 'अंडरइन्शुअर्ड' म्हणजेच अपुरा विमा असलेला देश आहे. जागतिक स्तराच्या तुलनेत भारतात 'टर्म इन्शुरन्स' घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. मृत्यूशी संबंधित आर्थिक नियोजनावर चर्चा करण्याबाबत असलेली सामाजिक हिचकिचाहट यासाठी कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे बचतीसोबतच पुरेसे विमा संरक्षण असणे हे संतुलित आर्थिक आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

भविष्यात विमा क्षेत्रासमोर सर्वात मोठे आव्हान हे बचतीची सवय कायम राखत 'प्रोटेक्शन कव्हर' वाढवणे हे असेल. एनपीएस आणि म्युच्युअल फंडांसारख्या गुंतवणूक साधनांना विमा हा पर्याय नसून पूरक आहे, कारण तो गुंतवणुकीसोबतच खात्रीशीर रोख प्रवाह आणि जोखीम व्यवस्थापनाचे अनोखे मिश्रण देतो. विमा कंपन्यांची आर्थिक स्थिती भक्कम असून त्या नियामक निकषांपेक्षा अधिक भांडवल राखून आहेत. ६.३ लाख कोटी रुपयांचे वार्षिक लाभ देण्याची क्षमता या उद्योगाची परिपक्वता सिद्ध करते. आता गरज आहे ती केवळ बचतीच्या पलीकडे जाऊन कुटुंबासाठी एक भक्कम सुरक्षा कवच निर्माण करण्याची.



## रेल्वे तिकीटाचे बदललेले नियम

भारतीय रेल्वेने तिकीट रद्द करण्याच्या नियमांमध्ये मोठे बदल केले असून, यामुळे प्रवाशांना आता ऐनवेळी प्रवास रद्द करणे महागात पडणार आहे. एप्रिल २०२६ च्या पहिल्या पंधरवड्यापासून लागू होणाऱ्या या नवीन नियमांनुसार, ठराविक वेळेनंतर तिकीट रद्द केल्यास कोणताही परतावा मिळणार नाही. दलाल आणि एजंटकडून होणारी तिकिटांची साठेबाजी रोखण्यासाठी रेल्वेने हे पाऊल उचलले आहे.

रेल्वेच्या सुधारित धोरणानुसार, परताव्याची रक्कम आता वेळेवर अवलंबून असेल. जर तुम्ही गाडी सुटण्यापूर्वी ७२ तासांआधी तिकीट रद्द केले, तर केवळ ठराविक 'फ्लॅट' शुल्क कापले जाईल. मात्र, त्यानंतरच्या कालावधीसाठी नियम खालीलप्रमाणे असतील:

■ **२४ ते ७२ तास:** गाडी सुटण्यापूर्वी २४ ते ७२ तासांच्या दरम्यान तिकीट रद्द केल्यास एकूण भाड्याच्या २५ टक्के रक्कम कपात केली जाईल.

■ **८ ते २४ तास:** प्रवासाच्या ८ ते २४ तास आधी तिकीट रद्द केल्यास ५० टक्के भाडे कापले जाईल.

■ **८ तासांपेक्षा कमी वेळ:** सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे, गाडी सुटण्यास ८ तासांपेक्षा कमी वेळ शिल्लक असताना तिकीट रद्द केल्यास एकही रुपया परतावा मिळणार नाही. संपूर्ण रक्कम रेल्वेकडून जप्त केली जाईल.

■ **पारदर्शकतेसाठी आधार प्रमाणीकरण अनिवार्य**

रेल्वेने केवळ कॅन्सलेशनच नव्हे, तर बुकिंग प्रक्रियेतही आमूलाग्र बदल केले आहेत. ऑक्टोबर २०२५ पासून सामान्य कोट्यातील आरक्षित तिकीट बुकिंगच्या पहिल्या १५ मिनिटांत आयआरसीटीसी संकेतस्थळ किंवा ॲपवर आधार प्रमाणीकरण (आधार ऑथेंटिकेशन) अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळे अनधिकृत एजंट किंवा 'बॉट्स'द्वारे होणारी तिकीट पळवापळवी थांबवण्यास मदत होत आहे. तत्काळ तिकिटांसाठीही जुलै २०२५ पासून हीच पद्धत लागू करण्यात आली आहे.

■ **एजंट्सवर नवीन निर्बंध**

प्रवाशांना सोयीस्करपणे तिकीट मिळावे यासाठी रेल्वेने एजंट्सवरही कडक मर्यादा घातल्या आहेत. तत्काळ बुकिंग सुरू झाल्याच्या पहिल्या ३० मिनिटांत एजंट्सना तिकीट बुक करता येणार नाही.

■ **एसी क्लास:** सकाळी १० ते १०:३० या वेळेत एजंट्सना प्रवेश बंदी असेल.

■ **नॉन-एसी क्लास:** सकाळी ११ ते ११:३० या वेळेत केवळ वैयक्तिक वापरकर्तेच तिकीट बुक करू शकतील. रेल्वे प्रशासनाच्या दाव्यानुसार, या बदलांमुळे सर्वसामान्यांना तिकीट मिळणे सुलभ होईल आणि प्रणालीमध्ये अधिक पारदर्शकता येईल. मात्र, प्रवाशांना आता तिकीट काढताना आणि रद्द करताना वेळेचे गणित अत्यंत अचूकपणे मांडावे लागणार आहे.

## गृहकर्जाचा हप्ता ठरवताना....



गृहकर्जाचा कालावधी आणि त्याची परतफेड करण्याचे नियोजन हा केवळ गणिताचा भाग नसून तो आपल्या जीवनशैलीशी जोडलेला एक महत्त्वाचा आर्थिक निर्णय आहे. साधारणपणे ३२ व्या वर्षी, जेव्हा करिअरमध्ये प्रगतीची संधी असते आणि दोन्ही जोडीदार कमावते असतात, तेव्हा दोन कोटी रुपयांच्या घरासाठी कर्ज घेताना दोन मुख्य पर्याय समोर येतात. पहिला पर्याय म्हणजे दीर्घ मुदतीचे कर्ज निवडून मासिक हप्त्याचा (ईएमआय) बोजा कमी ठेवणे आणि दुसरा म्हणजे आक्रमकपणे कर्ज फेडून व्याजाचा खर्च वाचवणे. या दोन्ही पर्यायांचे स्वतःचे फायदे आणि तोटे आहेत, जे आपल्या भविष्यातील आर्थिक स्थैर्यावर परिणाम करतात.

दीर्घ मुदतीचा म्हणजेच २० ते २५ वर्षांचा कालावधी निवडल्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे मासिक हप्ता कमी राहतो. यामुळे मुंबईसारख्या महागड्या शहरात राहताना घरखर्च, विमा आणि आपत्कालीन निधीसाठी हातात पुरेशी रोख रक्कम शिल्लक राहते. कमी हप्ता असल्यामुळे गुंतवणूकदाराला म्युच्युअल फंड किंवा इतर शेअर्समध्ये एसआयपी सुरू ठेवता येते, ज्याचा परतावा अनेकदा गृहकर्जाच्या व्याजापेक्षा जास्त असू शकतो. मात्र, या पर्यायात एक मोठी त्रुटी म्हणजे कर्जाच्या मूळ रकमेपेक्षा व्याजापोटी दिली जाणारी रक्कम कित्येक पटीने जास्त असते. दीर्घकाळ कर्ज अंगावर असणे हे मानसिक दडपणही निर्माण करू शकते, विशेषतः भविष्यातील अनपेक्षित आर्थिक बदलांच्या काळात.

दुसरीकडे, कर्जाची आक्रमकपणे परतफेड करणे हे दीर्घकालीन बचतीसाठी अत्यंत फायदेशीर ठरते. गृहकर्जाच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये हप्त्याचा मोठा हिस्सा हा केवळ व्याजापोटी जातो आणि मूळ रक्कम संथ गतीने कमी होते. अशा वेळी जर दरवर्षी मूळ रकमेचा ५ ते १० टक्के हिस्सा 'प्री–पेमेंट' म्हणून भरला, तर कर्जाचा कालावधी आश्चर्यकारक रीतीने कमी होतो. उदाहरणादाखल, जर दरवर्षी एक अतिरिक्त हप्ता भरला किंवा बोनसचा वापर मुदतपूर्व परतफेडीसाठी केला, तर २० वर्षांचे कर्ज अवघ्या १२ ते १५ वर्षांत संपू शकते. यामुळे वाचणारे व्याज हे लाखो रुपयांच्या घरात असते, जी तुमची निव्वळ बचत मानली जाते.


गृहकर्जाचा निर्णय घेताना प्राप्तिकराच्या सवलतींचा विचार करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गृहकर्जाच्या व्याजावर कलम २४ आणि मूळ रकमेवर कलम ८० सी अंतर्गत मिळणारी सवलत ही कर्ज घेणाऱ्यासाठी एक जमेची बाजू असते. जर तुमचे उत्पन्न उच्च कर कक्षेमध्ये (टॅक्स ब्रॅकेट) येत असेल, तर कर्ज चालू ठेवणे हे कर बचतीसाठी फायदेशीर ठरू शकते. मात्र, दोन कोटींसारख्या मोठ्या कर्जाच्या बाबतीत केवळ कर सवलतीसाठी कर्ज लांबवणे हे आर्थिकदृष्ट्या तोट्याचे ठरू शकते, कारण वाचलेला कर हा भरलेल्या व्याजाच्या तुलनेत खूपच कमी असतो.

या सर्व परिस्थितीत 'सुवर्णमध्य' साधणे हा सर्वोत्तम मार्ग मानला जातो. सुरुवातीला २० वर्षांचा कालावधी निवडून मासिक हप्ता लवचिक ठेवावा, जेणेकरून कोणत्याही आर्थिक अडचणीत अडथळा येणार नाही. त्यानंतर, दरवर्षी उत्पन्नात होणाऱ्या १० ते १५ टक्के वाढीनुसार गृहकर्जाचा हप्ताही हळूहळू वाढवावा किंवा वर्षातून एकदा मोठी रक्कम मूळ कर्जात जमा करावी. अशा प्रकारे, तुम्ही गुंतवणुकीच्या संधीही साधू शकता आणि व्याजाचा मोठा बोजाही कमी करू शकता. गृहकर्ज हे ओझे न वाटता संपत्ती निर्मितीचे साधन व्हावे, यासाठी ही आर्थिक शिस्त पाळणे अनिवार्य आहे.

## नॅरो सेक्टोरल फंड म्हणजे नक्की काय?

म्युच्युअल फंड कंपन्या सध्या विशिष्ट आणि मर्यादित विषयांवर आधारित नवनवीन योजना बाजारात आणत आहेत, ज्यांना प्रामुख्याने एक्स्चेंज ट्रेडेड फंड्स म्हणजेच ईटीएफच्या स्वरूपात सादर केले जाते. नॅरो सेक्टोरल फंड हे अशा योजना आहेत ज्या एका अतिशय विशिष्ट उप–क्षेत्रातील कंपन्यांमध्ये गुंतवणूक करतात. उदाहरणार्थ, केवळ रसायने, ऑटो, रिअल इस्टेट, भांडवली बाजार किंवा रेल्वे क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रम यांसारख्या मर्यादित कार्यक्षेत्रात या कंपन्या कार्यरत असतात. हे फंड एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील तेजीचा किंवा बदलाचा फायदा घेण्यासाठी तयार केलेले असतात आणि यात गुंतवणूक करण्यासाठी मर्यादित पर्याय उपलब्ध असतात.

● **मोठ्या नफ्याची शक्यता आणि जोखीम**



जेव्हा एखादे विशिष्ट क्षेत्र प्रगतीच्या चक्रात असते, तेव्हा अशा फंडांमधून मोठ्या परताव्याची शक्यता निर्माण होते. अनुभवी गुंतवणूकदार संरचनात्मक किंवा चक्राकार बदलांचा फायदा घेण्यासाठी अशा फंडांचा वापर करतात. हे फंड प्रामुख्याने 'पॅसिव्हली मॅनेज्ड' असल्याने यात फंड मॅनेजरच्या निर्णयाची वैयक्तिक जोखीम कमी असते आणि खर्चदेखील तुलनेने कमी असतो. मात्र, या धोरणाशी जोडलेली जोखीमही तितकीच मोठी आहे. केवळ एकाच क्षेत्रावर लक्ष केंद्रित केल्यामुळे यात वैविध्याचा अभाव असतो आणि बाजारातील चढ–उतारांचा थेट परिणाम गुंतवणुकीवर होतो. सरकारी धोरणांमधील बदल, त्या क्षेत्राचे मूल्य आणि तरलतेच्या मर्यादा यामुळे परताव्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

● **वेळेचे गणित आणि गुंतवणूकदारांसाठी सल्ला**

या प्रकारच्या निधीतून मिळणारा नफा हा प्रामुख्याने गुंतवणूकदाराच्या 'एन्ट्री' आणि 'एक्झिट' म्हणजेच प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या अचूक वेळेवर अवलंबून असतो. चुकीच्या वेळी केलेली गुंतवणूक केवळ कागदोपत्री तोटा न राहता प्रत्यक्ष आर्थिक नुकसान ठरते. त्यामुळेच, ज्यांना बाजारपेठेतील चक्रांची खोलवर समज आहे आणि ज्यांची जोखीम स्वीकारण्याची क्षमता मोठी आहे, अशा अनुभवी गुंतवणूकदारांसाठीच हे उत्पादन योग्य ठरते. पहिल्यांदाच गुंतवणूक करणाऱ्या किंवा सुरक्षितता शोधणाऱ्या गुंतवणूकदारांनी अशा फंडांपासून दूर राहणे हिताचे आहे. आपल्या एकूण इक्विटी पोर्टफोलिओमध्ये अशा फंडांचा हिस्सा १० टक्क्यांपेक्षा जास्त नसावा आणि किमान पाच वर्षांचा कालावधी डोळ्यासमोर ठेवूनच यात गुंतवणूक करावी.

## करबचतीचा सापळा आणि छुप्या खर्चांचा फटका

करबचतीसाठी गुंतवणूक करताना अनेकदा आपण केवळ सवलतींचा विचार करतो, परंतु त्यासोबत येणारे छुपे खर्च आपल्या नफ्यावर डल्ला मारतात. तज्ज्ञांच्या मते, गुंतवणुकीचे गणित मांडताना या खर्चांकडे दुर्लक्ष करणे महागात पडू शकते. विशेषतः कलम ८० सी अंतर्गत गुंतवणूक करताना अनेक छुपे घटक आपल्या परताव्याला कात्री लावतात.

● **शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील अदृश्य खर्च**

गुंतवणूक करताना आपल्याला सर्वात आधी सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) चा सामना करावा लागतो. इक्विटी शेअर्स किंवा म्युच्युअल फंडांच्या खरेदी–विक्रीवर हा कर आकारला जातो, ज्याची वजावट आपल्याला मिळत नाही. वारंवार व्यवहार केल्यास या कराचा बोजा वाढत जातो. याशिवाय मुद्रांक शुल्क आणि व्यवहार शुल्कदेखील आपल्या निव्वळ नफ्यात घट करतात.




म्युच्युअल फंडाच्या बाबतीत 'एक्झिट लोड' ही एक मोठी डोकेदुखी ठरते. जर आपण ठराविक काळापूर्वी गुंतवणूक काढून घेतली, तर साधारण १ टक्का शुल्क कापले जाते. ईएलएसएस सारख्या योजनांमध्येही हा नियम लागू होतो. सर्वात घातक ठरतो तो 'एक्सपेन्स रेशियो'. फंड हाऊस दरवर्षी आपल्या 'एनएव्ही'मधून ठराविक रक्कम कापून घेते. १–२ टक्क्यांचा हा फरक दीर्घकाळात कंपाउंडिंगच्या जोरावर लाखांचे नुकसान करू शकतो.

● **इतर गुंतवणुकीतील छुपे अडथळे**


केवळ शेअर बाजारच नव्हे, तर गृहकर्जासारख्या पर्यायांमध्येही छुपे खर्च असतात. जर आपण कर्ज वेळेआधी फेडले, तर बँका प्री–पेमेंट किंवा फोरक्लोजर चार्जेस आकारतात. यामुळे व्याजावरील कर सवलतीचा फायदा तर कमी होतोच, पण वरून अतिरिक्त शुल्क भरावे लागते. डिमॅट खात्याचे वार्षिक देखभाल शुल्क (एएमसी) आणि पोर्टफोलिओ मॅनेजमेंट सर्व्हिसेसची फी देखील हळूहळू आपली संपत्ती कमी करत असते.

परदेशात गुंतवणूक करणाऱ्यांसाठी लिबरलाइज्ड रेमिटन्स स्कीम (एलआरएस) अंतर्गत चलन रूपांतरण शुल्क आणि बँकेची फी हे मोठे खर्च ठरतात. या सर्व प्रक्रियेत चलनाच्या दरातील तफावत आपल्या परताव्याला खिळ घालते.

● **गुंतवणुकीचा स्मार्ट मार्ग**

करबचतीचा विचार करताना केवळ वजावटीवर लक्ष न देता, सर्व खर्च वजा जाता हातात किती रक्कम उरते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. गुंतवणुकीत सातत्य राखणे, वारंवार खरेदी–विक्री टाळणे आणि कमी एक्सपेन्स रेशियो असलेले फंड निवडणे हाच दीर्घकालीन फायद्याचा मार्ग आहे.थोडक्यात सांगायचे तर, कर नियोजन म्हणजे केवळ योग्य योजना निवडणे नव्हे, तर त्या योजनेचा संपूर्ण खर्च समजून घेणे होय. तरच तुमची गुंतवणूक खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.

## वाहनकर्ज फेडल्यानंतर...



गाडीच्या कर्जाचा शेवटचा हप्ता भरला म्हणजे सर्व जबाबदारी संपली असे मानणे ही मोठी तांत्रिक चूक ठरू शकते. अनेकदा कर्ज पूर्ण फेडूनही आरसी बुकवर बँकेचे नाव 'हायपोथिकेशन' म्हणून कायम असते. जोपर्यंत तुम्ही हे नाव कायदेशीर प्रक्रियेद्वारे काढून टाकत नाही, तोपर्यंत ती गाडी कागदोपत्री पूर्णपणे तुमच्या मालकीची नसते. यामुळे भविष्यात गाडीची विक्री करताना किंवा विम्याचा दावा करताना मोठे कायदेशीर अडथळे निर्माण होऊ शकतात. ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न केल्यास, अपघात झाल्यास विम्याची रक्कम थेट बँकेच्या खात्यात जमा होण्याचा धोका असतो, कारण कागदपत्रांनुसार बँकच त्या मालमत्तेची मालक मानली जाते.

कर्जफेडीनंतर सर्वात महत्त्वाचे पाऊल म्हणजे बँकेकडून 'नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट' म्हणजेच एनओसी प्राप्त करणे. बँक साधारणपणे दोन प्रतींमध्ये ही एनओसी देते, ज्यासोबत फॉर्म ३५ जोडलेला असतो. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, या एनओसीची वैधता केवळ ९० दिवसांची असते. त्यामुळे ही कागदपत्रे मिळाल्यावर विलंब न करता आरटीओ कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक आहे. या प्रक्रियेसाठी गाडीचा वैध विमा, पीयूसी प्रमाणपत्र आणि मूळ आरसी बुक ही कागदपत्रे हाताशी असणे गरजेचे आहे. ही सर्व कागदपत्रे गोळा केल्यानंतरच हायपोथिकेशन हटवण्याची पुढील कार्यवाही सुरू करता येते.

सध्याच्या काळात ही प्रक्रिया 'परिवहन' पोर्टलद्वारे ऑनलाइन पद्धतीने अत्यंत सुलभ झाली आहे. पोर्टलवर 'हायपोथिकेशन टर्मिनेशन' हा पर्याय निवडून आवश्यक शुल्क भरावे लागते. शुल्क भरल्यानंतर मिळालेली पावती आणि बँकेची मूळ कागदपत्रे संबंधित आरटीओ कार्यालयात जमा करावी लागतात. तिथे कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यावर, आरसी बुकवरील बँकेचे नाव अधिकृतपणे हटवले जाते. या प्रक्रियेनंतर काही दिवसांतच नवीन आरसी बुक तुमच्या नोंदणीकृत पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठवले जाते. ज्यावर केवळ तुमचेच नाव मालक म्हणून नमूद असते. अनेक वाहनधारक केवळ आळसामुळे ही प्रक्रिया प्रलंबित ठेवतात, परंतु गाडीची पुनर्विक्री करताना यामुळे मोठे नुकसान सोसावे लागते. जुन्या आरसी बुकवर बँकेचे नाव असल्यास नवीन खरेदीदार ती गाडी विकत घेण्यास कचरतो किंवा किंमत कमी करतो. तसेच, विम्याचे नूतनीकरण करतानाही तांत्रिक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे आर्थिक व्यवहारांची पूर्तता झाल्यानंतर कायदेशीर मालकी हक्क स्वतःच्या नावावर करून घेणे, हे एका सुजाण वाहनमालकाचे कर्तव्य आहे. ही साधी दिसणारी प्रक्रिया तुमच्या मालमत्तेचे पूर्ण संरक्षण सुनिश्चित करते.

## बाजारातील हेलकाव्यांमधील संधी

गुंतवणूक क्षेत्रातील नवख्या व्यक्तीला या हेलकाव्यांमुळे अनेकदा अस्वस्थ वाटू शकते, परंतु अनुभवी नजरेतून पाहिले तर ही अस्थिरता म्हणजे नफा कमावण्याची एक सुवर्णसंधीच असते. जेव्हा बाजार वेगाने वधारतो तेव्हा अधिक नफा मिळवण्याच्या हव्यासामुळे अनेक जण चुकीच्या किमतीला खरेदी करतात, तर अचानक होणाऱ्या घसरणीमुळे घाबरून जाऊन साठवलेली पुंजी काढून घेतात. ही मानवी मानसिकता समजून घेणे आणि त्याविरुद्ध कृती करणे, हाच यशस्वी गुंतवणुकीचा खरा मंत्र आहे. विशेषतः ऑनलाइन ट्रेडिंगच्या काळात, जिथे क्षणोक्षणी किमती बदलताना दिसतात, तिथे स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवणे अधिक महत्त्वाचे ठरते.

शेअर बाजाराचे वर्तन हे एखाद्या लहरी व्यक्तीसारखे असते, जिचा स्वभाव आणि मूड सतत बदलत असतो. काही दिवसांत ही व्यक्ती प्रचंड उत्साहात असते आणि प्रत्येक वस्तू महागड्या दरात विकत घ्यायला तयार होते, तर काही दिवसांत ती इतकी निराश होते की आपल्याकडील मौल्यवान मालमत्ता कवडीमोल दराने विकायला निघते. बाजारातील या भावनिक हिंदोळ्यांचा फायदा तोच घेऊ शकतो जो किमतीच्या मागे न धावता मूल्याचा विचार करतो. अल्पकाळात बाजार हा केवळ लोकांच्या मतांवर आणि बातम्यांवर चालणाऱ्या एखाद्या यंत्रासारखा असतो, पण दीर्घकाळात तो केवळ कंपनीच्या खऱ्या




कामगिरीचा आणि ताकदीचा विचार करतो. त्यामुळे जेव्हा चोहोबाजूला भीतीचे वातावरण असते, तेव्हाच दर्जेदार कंपन्यांचे शेअर्स सवलतीत मिळवण्याची खरी वेळ असते.

गुंतवणूकदाराने बाजाराच्या प्रत्येक टप्प्यावर आपली भूमिका स्पष्ट ठेवली पाहिजे. जेव्हा बाजारात मोठी तेजी असते, तेव्हा सर्वजण वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याचा प्रयत्न करतात, अशा वेळी अतिउत्साह टाळून सावध राहणे गरजेचे असते. याउलट जेव्हा बाजार कोसळतो आणि सर्वत्र घबराट पसरलेली असते, तेव्हा धैर्य दाखवून केलेली गुंतवणूक भविष्यात मोठी संपत्ती निर्माण करून देते. काही वेळा बाजार एकाच पातळीवर रेंगाळतो, अशा स्थितीत संयमाची खरी परीक्षा असते. येथे घाई न करता हळूहळू आणि सातत्याने गुंतवणूक करत राहणे फायद्याचे ठरते. ज्ञानापेक्षाही तुमची गुंतवणूक हाताळण्याची पद्धत आणि मानसिक प्रगल्भता तुम्हाला इतरांपेक्षा वेगळे ठरवते.

यशस्वी होण्यासाठी केवळ तांत्रिक माहिती असून चालत नाही, तर संयम, शिस्त आणि दीर्घकालीन विचार करण्याची क्षमता हे गुण अंगी बाणवावे लागतात. बाजारातील कोलाहल आणि अफवांकडे दुर्लक्ष करून केवळ कंपनीच्या मूळ मूल्यावर लक्ष केंद्रित केल्यास चढ–उतारांची भीती वाटण्याऐवजी त्यातील संधी दिसू लागतात. संधीचा फायदा घेण्यासाठी नेहमी काही प्रमाणात रोख रक्कम हाताशी ठेवणे हे एक स्मार्ट धोरण आहे. तुम्ही बाजाराची दिशा बदलू शकत नाही, पण त्या दिशेनुसार आपली नौका कशी वळवायची हे नक्कीच तुमच्या हातात असते. शांत डोक्याने घेतलेले निर्णय आणि नियोजित कृतीच तुम्हाला गुंतवणुकीच्या प्रवासात एक यशस्वी योद्धा बनवू शकते.

# श्री सांदिपनी अकॅडमीतर्फे १००% शिष्यवृत्तीची संधी

## 'निश्चय' परीक्षेला प्रतिसाद



श्री सांदिपनी अकॅडमीतर्फे आयोजित 'निश्चय' परीक्षेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला.

नगर – शहरातील शैक्षणिक संस्था श्री सांदिपनी अकॅडमीच्या वतीने आयोजित 'निश्चय २०२६' (Entrance cum Scholarship Exam) या राज्यस्तरीय प्रवेश व शिष्यवृत्ती परीक्षेला विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. ५ एप्रिल रोजी एकविरा चौक येथील आयआयटी–जेईई कॅम्पसमध्ये पार पडलेल्या या परीक्षेत इयत्ता ६ वी ते १०वी मधील ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अकॅडमीचे संचालक डॉ. के. बालराजू कर्री म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या यशाचा 'निश्चय' हा केवळ आमचा नारा नसून आमचे ध्येय आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पाठांतर उपयोगाचे नाही, तर संकल्पना स्पष्ट असणे गरजेचे आहे. या परीक्षेच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांमधील तार्किक क्षमता आणि विषय सखोल समजून घेण्याची वृत्ती तपासत आहोत. या परीक्षेमुळे गुणवंत पण आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

अकॅडमीचे सहसंचालक नानासाहेब बारहाते यांनी परीक्षेच्या नियोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, श्री सांदिपनी अकॅडमी नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. आज ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी दिलेली ही परीक्षा त्यांच्या भविष्यातील आयआयटी, नीट आणि इतर स्पर्धा परीक्षांचा भक्कम पाया ठरेल. इयत्ता ६ वी पासूनच फाउंडेशन कोर्सेसची तयारी केल्यास विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, हेच आम्ही 'निश्चय २०२६' मधून साध्य करत आहोत.

यावेळी सहसंचालक राहुल गुजराल यांनी नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशाबाबत महत्त्वाची माहिती दिली. ते म्हणाले, निश्चय २०२६ परीक्षेला मिळालेला प्रतिसाद पाहून आम्हाला आनंद होत आहे. परीक्षेतील गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांना १०० टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली आहे आणि ज्यांना दर्जेदार शिक्षण हवे आहे, अशा सर्व पालकांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, पालकांनी त्वरित संपर्क साधून आपले प्रवेश निश्चित करावेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या परीक्षेमध्ये टॉप १५ विद्यार्थ्यांना ५०% ते १००% पर्यंत शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. स्टेट बोर्ड आणि सीबीएसई अशा दोन्ही माध्यमांच्या विद्यार्थ्यांसाठी डेली फाउंडेशन आणि वीकेंड फाउंडेशन बॅचेस उपलब्ध आहेत. अनुभवी शिक्षक, अद्ययावत अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठीची विशेष यंत्रणा ही श्री सांदिपनी अकॅडमीची वैशिष्ट्ये आहेत.

ही परीक्षा यशस्वी करण्यासाठी श्री सांदिपनी अकॅडमीच्या शिक्षक आणि कर्मचारी वृंदाने परिश्रम घेतले. परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर होणार असून, अधिक माहितीसाठी अकॅडमीच्या कार्यालयात संपर्क साधावा, असेही संस्थेमार्फत कळवण्यात आले आहे.



फ्रेंडस् कॉर्पोरेट टी–२० क्रिकेट लीगचे उद्घाटन करण्यात आले.

# फ्रेंडस् कॉर्पोरेट टी–२० क्रिकेट लीगला सुरुवात

नगर – अहिल्यानगर येथील साईदीप क्रिकेट अकॅडमीच्या वाकोडी येथील क्रिकेट मैदानावर फ्रेंडस् कॉर्पोरेट टी–२० क्रिकेट लीगच्या तिसऱ्या पर्वाला नुकताच प्रारंभ झाला. कॉर्पोरेट क्षेत्रातील खेळाडूंसाठी आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा केवळ सुट्टीच्या दिवशीच रंगणार असल्याने सहभागी खेळाडूंमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन साईदीप सह्याद्री मणिपाल हॉस्पिटलचे जनरल मॅनेजर डॉ. व्यंकटेश मुळे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, अशा क्रीडा स्पर्धांमुळे कामाच्या ताणतणावातून मुक्त होण्यास मदत होते तसेच आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन मिळते.

स्पर्धेचे आयोजन तेजस करमरकर, प्रकाश राठोड व चैतन्य खोलगडे यांनी केले असून अकॅडमीचे संचालक संदीप घोडके यांचे सहकार्य लाभले आहे. यंदाच्या स्पर्धेत अनेक संघांनी सहभाग नोंदविला असून सर्व संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. मागील वर्षांच्या तुलनेत यंदाची स्पर्धा अधिक यशस्वी होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.



## अहमदनगर पहिली मंडळी (काँग्रीगेशनल) ह्युम मेमोरियल चर्चच्या वतीने ईस्टर संडे निमित्त विशेष उपासना

अहमदनगर पहिली मंडळी (काँग्रीगेशनल) ह्युम मेमोरियल चर्चच्या वतीने ईस्टर संडे निमित्त विशेष उपासना आयोजन करण्यात आले. या भक्तीचे मंडळींचे आचार्य रेव्ह. डॉ. सनी पी. मिसाळ यांनी भक्ती उपासना चालवत तसेच कोल्हापूर चर्च कौन्सिलचे रेव्ह. श्रीकांत बी. पठाणे यांनी पुनरुथीत ख्रिस्त गाजवत भाविकांनी मोठ्या आवाजात म्हणत होते. प्रभू उठला आहे, तो खरोखर उठला आहे. या घोषणा देण्यात आल्या. यावेळी मंडळीचे सेक्रेटरी नंद प्रकाश शिंदे, खजिनदार प्रकाश सूर्यवंशी, अमोल काळे, सागर घोडके, राजेश ओहळ, राजेश उजागरे, प्राची थोरात, संगीत सोनवणे यांच्यासह विश्वस्त मंडळी व तरुण संघ व ख्रिस्त बांधव उपस्थित होते.

# अनुवाद अधिकारी म्हणून डॉ. संजय बोरुडे यांची निवड



नगर – केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयात वरिष्ठ अनुवाद अधिकारी म्हणून मराठीतील साहित्यिक डॉ. संजय बोरुडे यांची निवड झाली आहे.

डॉ. संजय बोरुडे हे प्राथमिक शिक्षक असून त्यांनी मुंबई विद्यापीठातून '१९९० नंतरची मराठी ग्रामीण कविता' या विषयावर पीएच.डी. प्राप्त केली आहे.

डॉ. बोरुडे यांनी विमलेश त्रिपाठी (प. बंगाल) यांचा कवितासंग्रह हिंदीतून मराठीत, सॅन्दोर हालमोसी (हंगेरी) यांचा कविता संग्रह इंग्रजीतून मराठीत, प्रशांत कुमार महांति (ओरिसा) यांचा कथासंग्रह हिंदीतून इंग्रजीत, शशिकांत हिंगोणेकर यांचा कवितासंग्रह मराठीतून हिंदीत, रावसाहेब जाधव यांचा बालकविता संग्रह मराठीतून हिंदीत अनुवादित केला आहे. त्यांच्या स्वतःच्या 'The Hymn of Leaves' या इंग्रजी कवितासंग्रहाचा अनुवाद हंगेरियन भाषेत मुरायनी झिटा यांनी (बुडापेस्ट) केला आहे. तर हम्पीचे महेश बल्लारी यांनी कन्नड भाषेत; भुवनेश्वरच्या पारमिता षडंगी यांनी उडिया भाषेत; राजस्थानी भाषेत बिकानेर येथील साहित्यिक नीरज दइया यांनी नेपाळी भाषेत सिक्कीमचे विरभद्र कार्कीढोली, मल्याळम भाषेत नीलांबूरचे डॉ. टी. सिवन कुट्टी यांनी अनुवाद केलेला आहेत. तर बंजारा बोलीत शेवगावचे डॉ.संतोष राठोड करत आहेत.

याखेरीज त्यांनी अनेक भारतीय लेखक – कवयित्रींच्या कथा, कविता मराठीत अनुवाद केल्या आहेत. त्यामध्ये दिल्लीच्या ज्योती चावला, उमाशंकर चौधरी, जसवीर त्यागी, बंगालचे प्राणेंद्रनाथ मिश्रा इ.रांचा समावेश आहे.

# 'जिओ मार्ट डिजिटल' इलेक्ट्रॉनिक्स शोरूमचा शुभारंभ



'जिओ मार्ट डिजिटल' या इलेक्ट्रॉनिक्स शोरूमचा शुभारंभ करताना विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आदी.

नगर – जिओ मार्ट डिजिटल या इलेक्ट्रॉनिक्स शोरूमचा ५ एप्रिल रोजी शुभारंभ झाला. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते या दालनाचे उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्याला प्रमुख उपस्थिती म्हणून आळंदी येथील ह.भ.प. रामायणाचार्य श्रीनिवास महाराज घुगे यांचे आशीर्वाद लाभले. तसेच माजी आमदार बबनराव पाचपुते, आमदार संग्राम जगताप, आमदार विक्रमसिंह पाचपुते, महापौर ज्योतीताई गाडे, व्याख्याते गणेश शिंदे, उपमहापौर धनंजय जाधव, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले आणि चैतन्य उद्योग समूहाचे अध्यक्ष विठ्ठलराव वाडगे उपस्थित होते.

उद्घाटनानंतर बोलताना ना. राम शिंदे म्हणाले की, अहिल्यानगर शहर आता आधुनिकतेकडे वेगाने झेपावत आहे. जिओ मार्ट डिजिटलसारखे मोठे ब्रँड्स शहरात आल्यामुळे ग्राहकांना एकाच छताखाली दर्जेदार वस्तू आणि उत्तम सेवा मिळतील. जर्नादन लिपणे आणि अजय गावडे यांनी सुरू केलेला हा उपक्रम शहराच्या प्रगतीसाठी कौतुकास्पद आहे.

वसंत टॉकीज रोड, बंगाल चौकी येथे सुरू झालेल्या या शोरूममध्ये सोनी, सॅमसंग, विवो, ओप्पो यांसारख्या कंपन्यांचे टीव्ही, एसी, वॉशिंग मशीन फ्रिज आणि लेटेस्ट मॉडेल्सचे मोबाईल उपलब्ध आहेत. ग्राहकांना खरेदीचा आधुनिक अनुभव मिळावा, विश्वासार्हता जपली जावी आणि योग्य दरात वस्तू मिळाव्यात, हा या शोरूमचा मुख्य उद्देश असल्याचे संचालकांनी सांगितले.

याप्रसंगी जर्नादन लिपणे आणि अजय गावडे यांनी उपस्थितांचे आभार मानताना सांगितले की, शहरात प्रथमच सर्व नामांकित ब्रँड्स एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा आमचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. कोणताही नवा उपक्रम सुरू करताना आपल्या सर्वांचे आशीर्वाद आणि सहकार्य आमच्यासाठी ऊर्जादायी आहे. ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देणे हेच आमचे प्रथम कर्तव्य असेल.

कार्यक्रमाला व्यावसायिक, नागरिक आणि ग्राहक उपस्थित होते. संपर्क: ९८२२५७५००५ / ९९२३०४१००१

# बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी ८ एप्रिल रोजी जिल्हाव्यापी आंदोलन

## पेन्शन, शिष्यवृत्ती व घरकुलासह विविध मागण्यांसाठी वेधणार शासनाचे लक्ष



नगर – बांधकाम क्षेत्रातील कामगारांना पेन्शन, त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ तात्काळ मिळावा, यासाठी लोकशाही बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने कर्जत येथे जिल्हाव्यापी आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. ८ एप्रिल रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कर्जत तहसील कार्यालयासमोर हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष शंकर भैलुमे यांनी दिली.

संघटनेने प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून घेतले जाणारे अनेक निर्णय हे कामगारांच्या हिताचे नसून जाणीवपूर्वक अडचणी निर्माण करणारे आहेत. त्यामुळे कामगारांना योजनांचा लाभ मिळण्यात अडथळे येत आहेत.

महाराष्ट्रातील सर्व बांधकाम कामगारांना तात्काळ पेन्शन योजना लागू करावी, कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागितली जाणारी अतिरिक्त कागदपत्रांची अट रद्द करावी, आवश्यक वस्तू संच वितरणात होत असलेली अनियमितता व फसवणूक तात्काळ थांबवावी, सर्व पात्र कामगारांना घरकुल योजना तातडीने मंजूर करावी, भविष्यात लॉकडाऊनसारखी परिस्थिती निर्माण झाल्यास प्रत्येक कामगाराला किमान १० हजार रुपयांची मदत देण्याचा शासन निर्णय काढावा, भांडी व अत्यावश्यक वस्तू संचांचे तालुका स्तरावर ऑनलाइन वितरण सुरू करावे, इतर राज्यांच्या धर्तीवर कामगारांच्या मुलांना लॅपटॉप योजना लागू करावी, मृत बांधकाम कामगारांचे प्रलंबित अर्ज तात्काळ मंजूर करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

या आंदोलनासाठी पुनम समुद्र, शालन मोहिरे, सुनिता अवचर, आशा माने, स्वप्नील जाधव, नमिता गुंड, स्वाती शिंदे, मिरा पारसे, गीतांजली अडसुळ, अशोक डांडर, रानी साळवे, आरमा शेख, समिना सय्यद, शाईन शेख, सानिया झारेकरी, दत्तात्रय लांडगे, कानिलाल भिसे, छाया सांगळे, वानू शेख, भाग्यश्री शिंदे, अब्बास तांबोळी, सुनिल जाधव, रमेश बरकटे, योगेश चव्हाण, सविता आरने, अमृत काळे, केशव दातीर, यास्मिन बागवान, चंद्रकांत चव्हाण, राजूभाई तांबोळी, शिल्पा म्हस्के, शवाना बागवान, फारुक शेख, वंदत्ता समुद्र, सारिका घोडके, राणी पिटेकर, कल्याणी थोरात, नितीन अवचार, अभिमन्यू पिटेकर, अनुप भैलुमे आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

# जागतिक नवकार महामंत्र दिन जनजागृती सायकल रॅलीला प्रतिसाद



जागतिक नवकार महामंत्र दिनी आयोजित केलेल्या जनजागृती सायकल रॅलीचा आनंदधाम येथून सकाळी आलोकषीजी महाराज यांनी मंगळिक देऊन शुभारंभ केला.

नगर – संपूर्ण जगभरात ९ एप्रिल रोजी नवकार महामंत्र दिवस साजरा होत आहे. जगाचे कल्याण आणि शांतता निर्माण करण्याची अलौकिक शक्ती या मंत्रात आहे. नित्यनेमाने नवकार जाप केल्यास अलौकिक ऊर्जा प्राप्त होते. भौतिक जगात आत्मिक शांतता मिळते. याची प्रचीती जगभरात येत असल्याने जागतिक स्तरावर नवकार महामंत्र दिवस साजरा होतो. आचार्यश्रींच्या पुण्यभूमीत नगरमध्ये नवकार महामंत्र दिवस साजरा होत असून यानिमित्त जनजागृतीसाठी जितो अहिल्यानगर युथ विंग च्यावतीने रविवारी सकाळी आनंदधाम येथून सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत आबालवृद्धांनी उत्साहात सहभागी होऊन जनजागृती केली.

आनंदधाम येथून सकाळी आलोकषीजी महाराज यांनी मंगळिक देऊन रॅलीचा शुभारंभ केला. यावेळी जितो अहिल्यानगरचे संस्थापक चेअरमन गौतम मुनोत, विद्यमान चेअरमन आलोक मुनोत, सेक्रेटरी तुषार कर्नावट, सल्लागार समिती सदस्य अमित मुथा, युथ विंग चेअरमन चेतन भंडारी, सेक्रेटरी यश भंडारी, मॅट्रीमनी अपेक्स कमिटी सदस्य मेघना मुनोत, सायकल अभियानाचे कन्व्हेनर अभिनंदन भन्साळी, जेटीआर अपेक्स कमिटी सदस्य गौतम मुथा, लेडीज विंग चेअरमन संगिता मुथियान, व्हाईस चेअरमन सोनाली डुंगरवाल, जेबीएन कन्व्हेनर मनोज चोपडा, अजित बोरा, निखिल गांधी, दर्शन चोपडा, रितेश पटवा, सम्यक मुनोत, आयुष मुनोत यांच्यासह समाजातील नागरिक उपस्थित होते. सायकलिंगपटू चंद्रशेखर मुळे, नितीन पाठक, केतन बलदोटा, हेमंत लहाडे, मंगेश सातपुते, श्रीकांत वंगारी, भरत झंवर, संतोष उंधरे, लहू गावडे, सत्यनारायण पुरोहित, रूपेशकुमार भांबरे, अनिल सुराणा, संभाजी मोहिते, साधना मोहिते, जसमित वाधवा, दिनेश संकलेचा आदींचे सहकार्य लाभले.

आनंदधाम–मार्केट यार्ड–बंगाल चौकी– खिस्त गल्ली– कापड बाजार– दाळ मंडई – रामचंद्र खुंट– कोठी रोड ते आनंदधाम या रॅलीचा मार्ग होता. केशर गुलाब मंगल कार्यालय येथे रॅलीचा समारोप झाला. याठिकाणी सर्वांसाठी पौष्टिक नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. सायकल रॅलीत सहभागी होणाऱ्या सर्वांना मेडल देण्यात आले.

आलोकऋषीजी महाराज म्हणाले की, या रॅलीतून विश्वशांती, इंधन बचत, उर्जा बचत, पर्यावरण संवर्धन, समस्त प्राणीमात्रांचे कल्याण, सुदृढ आरोग्याचा संदेश देणार आहे. जितो अहिल्यानगर युथ विंग अतिशय सुंदर उपक्रम राबवित आहे. नवकार मंत्र हा जगासाठी तारक मंत्र आहे. आताच्या जागतिक अशांततेच्या काळात तर अहिंसा व शांततेचे महत्व अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. जगाला तारण्याची व शांतता प्रस्थापित करण्याची ताकद नवकार महामंत्रात आहे. नवकार जाप प्रत्येकाच्या मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा असतो. त्यामुळेच जागतिक स्तरावर नवकार महामंत्र दिवस साजरा केला जातो. या दिव्य आयोजनाचा उद्देश नवकार महामंत्राच्या अद्भुत शक्तीचा प्रचार व प्रसार करणे आणि अधिकाधिक लोकांना आध्यात्मिक साधनेसाठी प्रेरित करणे आहे.

# अहमदनगर मर्चंटस को ऑप. बँकेची उत्कृष्ट आर्थिक कामगिरीची परंपरा कायम

## २६ कोटी ७८ लाखांचा ढोबळ नफा, १६२२ कोटी ३२ लाखांच्या ठेवी



हस्तीमल मुनोत



अमित मुथा

नगर – अहमदनगर मर्चंट्स को–ऑप. बँक लि., अहमदनगरच्या संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत ३१ मार्च २०२६ अखेरच्या वर्षासाठीचे अनऑडिटेड आर्थिक निकाल मंजूर करण्यात आले आहे. परंपरेनुसार बँकेने स्थिर वाढ, पारदर्शक कारभार, मजबूत आर्थिक शिस्त आणि भक्कम आर्थिक पाया दर्शविला आहे. मागील आर्थिक वर्षात बँकेने ग्राहकहिताला प्राधान्य देत कर्जावरील व्याजदरात कपात करून ग्राहकांना दिलासा दिला, ज्यामुळे ग्राहक समाधानात लक्षणीय वाढ झाली आहे. बँकेला आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेने शेड्युल्ड बँकेचा दर्जा दिला आहे, अशी माहिती बँकेचे संस्थापक तथा विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी दिली.

या प्रसंगी चेअरमन हस्तीमल मुनोत, व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, संजय चोपडा, किशोर मुनोत, संजीव गांधी, सुभाष बायड, प्रमिलाताई बोरा, मिनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, सीईओ सुनील पुराणिक, जॉइंट सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा आदी उपस्थित होते.

ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर लाभ देऊनही बँकेने उत्कृष्ट कामगिरी नोंदवली असून २५ कोटी ३९ लाखांच्या व्याज सवलतीनंतर २६ कोटी ७८ लाखांचा ढोबळ नफा मिळविला आहे. हे बँकेच्या संतुलित आणि ग्राहकाभिमुख धोरणाचे द्योतक आहे. आयकर व रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आवश्यक सर्व तरतुदी केल्यानंतर बँकेने ७ कोटी ४४ लाख रुपये इतका निव्वळ नफा मिळविला आहे.

या वर्षात बँकेने व्यवसायात भरीव वाढ नोंदवली असून बँकेच्या एकूण ठेवी १६२२ कोटी ३२ लाखांवर पोहोचल्या आहेत. गत वर्षाच्या तुलनेत ठेवींमध्ये १६० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. एकूण कर्जवाटप १०४९ कोटी १२ लाख असून कर्ज वितरणात ८१ कोटींनी वाढ झाली आहे. कासा ठेवीत ६६ कोटींची लक्षणीय वाढ झाली आहे.

बँकेच्या मालमत्ता गुणवत्तेत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली असून नेट एनपीए जवळपास ०.६३ टक्क्यांवर आणण्यात यश आले आहे, तसेच एनपीए खात्यांसाठी भरीव आणि सुदृढ तरतुदी करण्यात आल्या आहेत. बँक आज अत्यंत मजबूत आर्थिक पायावर उभी असून २७१ कोटी ८१ लाखांच्या भक्कम राखीव निधीमुळे (सद्य स्थितीत सुमारे २८७ कोटी ६५ लाख) ठेवीदारांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

हस्तीमल मुनोत म्हणाले की, ग्राहकहित जपत बँकेने मजबूत नफा, भक्कम राखीव निधी आणि जवळपास शून्य एनपीए साध्य केले आहे. तंत्रज्ञान उन्नतीसह सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा देण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील. यामुळे ठेवीदारांचा विश्वास अधिक दृढ झाला असून बँक अत्यंत मजबूत स्थितीत आहे. बँकेच्या यशस्वी वाटचालीत सर्व सहकारी संचालक, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष कर्मचारी ग्राहकांना सदैव तत्पर सेवा देण्यात अग्रेसर असतात.

यावेळी अजय मुथा म्हणाले की, बँक तंत्रज्ञान उन्नतीवर विशेष भर देत असून, यावर्षी संचालक मंडळाचे मानस आहे की, नवीन कोअर बँकिंग सॉफ्टवेअर, युपीआय डायरेक्ट मेंबरशिप, कॉन्टॅक्टलेस कार्ड सेवा, कार्डलेस कॅश विथड्रॉल, ई मॅनडेट यासारख्या आधुनिक डिजिटल सुविधा लवकरच सुरू करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, ज्यामुळे ग्राहकांना अधिक सुरक्षित, जलद आणि सोयीस्कर बँकिंग सेवा उपलब्ध होणार आहेत.

बँकेच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे ठेवीदार, ग्राहक व सभासदांचा विश्वास अधिक बळकट झाला असून पारदर्शक कारभार, आर्थिक शिस्त आणि ग्राहकहिताचे धोरण यामुळे बँक प्रगतीच्या नव्या उंचीवर पोहोचत आहे.

अमित मुथा म्हणाले की, काळानुरूप बदल करत मर्चंटस बँकेने कॉर्पोरेट बँकिंग सेवा देण्यास सुरुवात केली आहे. मुख्य शाखेचा विस्तार करीत दाळमंडई येथे प्रशस्त 'हेडऑफिस नेक्स' कार्यालय उभारण्यात येत आहे. बँक भविष्यातही शाश्वत वाढ, आधुनिक सेवा, उत्कृष्ट ग्राहक अनुभव आणि आर्थिक समावेश यासाठी कटिबद्ध असून आगामी काळात अधिक मोठी यशस्वी वाटचाल करणार आहे.

